# श्रीज्योतिबाची पदे

## संत श्रीनाथभुजंग - विरचित

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५२८



REFBK-0024650
REFBK-0024650

संपादक : प्रा. कृष्णा गुरव



**प्रा. कृष्णा गुरव** जन्म : दि. २६ ऑगस्ट, १९४२ श्रावण पौर्णिमा

प्रा. कृष्णा गुरव हे अध्यात्मनिष्ठेत रंगलेले व्यक्तित्व आहे. अत्यंत खडतर परिस्थितीत एम्. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी चार वर्षे यशस्वीपणे शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील महाविद्यालयांत मराठीचे अध्यापन केले. परंतु बाळपणापासूनच त्यांची वृत्ती अंतर्मुख असल्यामुळे १९७१ मध्ये प्राध्यापक पदाचे त्यागपत्र देऊन ते सर्व लौकिकापासून निग्रहाने दूर झाले. आणि ज्ञानदेवांच्या प्रेरणेने अध्यात्मसाधनेत रंगले. ज्ञान-साधना काळात सुमारे पाच वर्षे आळंदी, आपेगाव, हिमालयाचा परिसर व उत्तर भारतातील प्रमुख तीर्थस्थळी त्यांनी मुक्त भ्रमंती केली. आणि एका उल्हासमय अवस्थेत कोल्हापूर येथे १९७६ मध्ये ‘ पश्यंती विद्या वलय ’ या आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थेची स्थापना केली. या संस्थेत प्रा. कृष्णा गुरव हे गेली आठ वर्षे साधकांच्या दृष्टीने ज्ञान-ध्यान पातळीवरील प्रवचने, साधनाशिबिरे, पारायण सप्ताह, नैमित्तिक आध्यात्मिक-सांस्कृतिक समारंभांचे आयोजन, ग्रंथनिर्मिती इ. प्रकारचे कार्य करीत आहेत. ज्ञानदेवांपासून जे. कृष्णमूर्तींपर्यंत अनेक महान दार्शनिकांचे विचारधन त्यांनी आंतरिक आस्थेने लुटले आहे. काव्य-संगीत-चित्रादी ललित कलांत आणि सृष्टीच्या रस-रंग-गंधात रंगून जाताना ते ज्ञानदेवांच्या सौंदर्य-योगी अध्यात्माचा वारसा सहज निष्ठेने सांभाळतात.

# श्रीज्योतिबाची पदे

□

प्रकाशिका :

**सौ. कमल लडकत**

पश्यंती प्रकाशन,

' पश्यंती ' ९४, साळोखे नगर, कोल्हापूर–४१६ ००७

फोन : २६२८४

□

प्रकाशन दिन :

शुक्रवार, ५ एप्रिल १९८५

चैत्र पौर्णिमा, श्रीज्योतिबा यात्रा

□

सर्वाधिकार :

**सौ. कमल लडकत**

□

ब्लॉक्स् :

**उदय प्रोसेस**, कोल्हापूर.

□

मुद्रक :

**पी. के. सरनोबत**

नवरंग मुद्रणालय,

१५५१ ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.

फोन : २५९०९

□

**किंमत : दहा रुपये फक्त**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५२८
दा. क्र. ४६५०
ग्रं. काव्य १४।८।८५

ऐसे काव्य भुजंगनाथाचे । कर्णी पडता अघ जाय साचे ।
पदे म्हणता सहजी वाचे । हरे जिवाचे दुःख पै ।।५३।।

विषबाधा नुरे साचि । पदे म्हणता भुजंगनाथाची ।
सकळ कामना पुरे जीवाची । कैवल्याची प्राप्ती पै ।।५९।।

जेथे जेथे भुजंग काव्य । भुजंगाचे नाही भय ।
ऐसे भगवान वदती स्वयें । साधुवर्य कलीमाजी ।।६०।।

वाजविता जेणे डउर । प्रगट होय शारंगधर ।
भूतपिशाच्च पळे त्वरे । निरसे ज्वर भवबाधा ।।८२।।

भुजंगनाथ स्मरता वाणी । भुजंग जाती स्थान सोडुनी ।
चमत्कार प्रत्यक्ष जनी । संत मेदिनी काळचा तो ।।८३।।

जे जे जयाचे मनोरथ । ते ते पुरवी भुजंगनाथ ।
धन्य साधु कलियुगात । दर्शन देत भाविका ।।९७।।

संत श्रीराजाराम प्रासादीकृत
'भक्तमंजरीमाला', अध्याय ८५



**श्री. जंगलबुवा गणुबुवा गायकवाड**

संत श्रीनाथभुजंग यांचे विद्यमान वंशज

(पृष्ठ २५)

हे कुलस्वामी ज्योतिर्नाथा,
संत श्रीनाथभुजंग यांची ही ' अक्षर ' पदे
आपल्या प्रेमकृपेमुळेच
प्रकाशित झालियत्.
आज चैत्र पौर्णिमेस
भावपूजापूर्वक
ती आपल्या चरणी
सश्रद्ध समर्पण !

# अनुक्रमणिका

दा. क्र.

संत श्रीनाथभुजंग : एक दिव्य जीवन-दर्शन ११

□


| पद क्र. | पदाचा आरंभ चरण | राग-ताल | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | केदारा तुझे पाय पाहूं दे | कल्याण, मध्य ताल | ३३ |
| २. | केदारा जीवन माझें | जंगला, ताल त्रिवट | ३४ |
| ३. | नयनाच्या नयनातें | ठुंबरी; ताल त्रिवट | ३४ |
| ४. | केदार उदार तुम्ही जगीं | गीत, ताल रूपक | ३४ |
| ५. | जिवलग जिवीचा | जंगला बिलंदी | ३५ |
| ६. | नमन सद्गुरु संतां | (अभंग) | ३५ |
| ७. | आतां तारी तारी श्रीनाथराया | कल्याण बिलंदी | ३६ |
| ८. | अहो ज्योतिरूपा जगद्गुरु | भूपकल्याण, झपताल | ३६ |
| ९. | श्रीनाथरूपा रे रे | जंगला, रूपक ताल | ३७ |
| १०. | श्रीनाथ केदार | कल्याण, एक ताल | ३७ |
| ११. | उदारा स्वामी सद्गुरूचे | कल्याण, मध्य ताल | ३८ |
| १२. | श्रीशिवज्योतिस्वरूपं वंदे | साळोक राग | ३८ |
| १३. | रेणुकारमणा रवळेशा | ललत, ताल त्रिवट | ३८ |
| १४. | नाथा तुझे पायीं | (अभंग) | ३९ |
| १५. | पतीत मी हरी | लंगडी बिलंदी | ४० |
| १६. | रत्नागिरीचा सौदागर | त्रिवट | ४० |
| १७. | जय ज्योतिर्लिंगा | ललत, ताल त्रिवट | ४१ |
| १८. | नाथा आस तुझी | काफी जंगला | ४१ |

| पद क्र. | पदाचा आरंभ चरण | राग-ताल | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १९. | केदारा कोमल हृदया | देसवाली जय जयवंती त्रिवट | ४१ |
| २०. | अति त्वरें तुझे पाय दावी | कल्याण, ताल बिलंदी | ४२ |
| २१. | जीवन माझें सये डोंगरीं | काफी जंगला | ४२ |
| २२. | चतुर्भुज रूप चांगले | गत लंगडी बिलंदी | ४३ |
| २३. | त्रिभंग देहुडा चरण | गत लंगडी | ४३ |
| २४. | वद गिर केदाराचा | कल्याण, ताल बिलंदी | ४४ |
| २५. | पाहूं नाथ चला या | दरबारी, ताल त्रिवट | ४५ |
| २६. | भू नव्हे अनळु | (अभंग) | ४५ |
| २७. | नाथा तुझें पायीं | जोगी, ताल त्रिवट | ४६ |
| २८. | नाथा तुझें पायीं | तोडी, त्रिवट | ४६ |
| २९. | पाहू चाल गडे साजणी | झिंजोटी रागणी | ४६ |
| ३०. | भोळ्याभाळ्याचा नाथ पाहूं | आनंदभैरवी | ४७ |
| ३१. | ध्याई ध्याई शिव | धनाश्री रागणी | ४७ |
| ३२. | ऐसे कैं नाथ करी | सोरठ, त्रिवट | ४८ |
| ३३. | केदारा मी आतां | सारंग, ताल त्रिवट | ४९ |
| ३४. | नाथाजीचे पाय पाहूं | जंगला, मध्य ताल | ४९ |
| ३५. | केदारा निजरूप दावी | जंगला, ताल त्रिवट | ४९ |
| ३६. | आम्ही नाथरायाचे दास | पूर्वि, ताल बिलंदी | ५० |
| ३७. | पाहिला दिठीं कांत | ठुंबरी जंगला | ५० |
| ३८. | पाहूं आनंदरूपास्वरूपा | जंगला, ताल बिलंदी | ५१ |
| ३९. | वंदे उत्तरेश्वरा शिवहर | आनंदभैरवी | ५१ |
| ४०. | जय जय शिव भोला | सोहनी रंगधुमाळी | ५२ |

| पद क्र. | पदाचा आरंभ चरण | राग–ताल | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ४१. | ध्यावा शिव सांब | कल्याण, त्रिवट | ५२ |
| ४२. | पंचानन दशकरा | पंचम धुमाळी | ५३ |
| ४३. | नमो सिधोबासाहेबाला | आदीवैराळी मध्यताल, त्रिवट ताल फेर | ५३ |
| ४४. | पांडेश्वर ईश्वर | आनंदभैरवी | ५४ |
| ४५ | शंभू हर हर रे | हामीर कल्याण | ५४ |
| ४६. | भज मन हर हर | कानडा बिलंदी | ५४ |
| ४७. | शिव ध्यानीं पाहिला वो | कल्याण यमन, ताल त्रिवट | ५५ |
| ४८. | भजावा त्रिपुरारी | यमन, ताल त्रिवट | ५५ |
| ४९. | आलासी जोतिबा जोतिबा | | ५६ |
| ५०. | श्रीनाथासी शरण जावें | (आर्या) | ५७ |
| ५१. | श्रीनाथराया तुजवीण मजशी | बिलंदी | ५७ |
| ५२. | पाहूं राजाधिराज | सोरठ मध्य ताल | ५८ |
| ५३. | नाथ सौदागर सौदागर | कल्याण, ताल त्रिवट | ५८ |
| ५४. | गाऊं नाम बरें नाथाचें | जंगला, ताल त्रिवट | ५८ |
| ५५. | आम्ही नाथ सखा गडी केला | जंगला, ताल त्रिवट | ५९ |
| ५६. | भजूं या भैरवा | भैरव, चौताल, मध्यताल, त्रिवट | ५९ |
| ५७. | भज मन भावें श्रीभैरवाला | आसावरी, ताल त्रिवट | ६० |
| ५८. | भैरव जोगाई जोगाई | भैरव जोगाई | ६० |
| ५९. | निजानंद सहजानंद बाई | जंगला | ६० |
| ६०. | हर हर परमेश्वरा | (आरती) | ६१ |
| ६१. | जय देव जय देव जय क्षेत्रपाळा | (आरती) | ६२ |


॥५८॥ ५२ ॥पद ख्याल मध्यताल॥
॥केदारा तुझे पाहुं दे ॥सदासुखा
॥मधी राहु दे॥ध्रु॥ श्रीरेणु
॥कार मणी जय घेशे मना ॥हय
॥गमनारिपुदमना तसदी॥नम
॥नाने मन सुमना ॥सद्गुरु वाहु
॥देगा॥१॥ श्रीनाथा तुझे पाये
॥रत्नागिरी निवासुका ॥रवि
॥शशी धारु ढचे तुभुजे ॥त्रिशु
॥ल पात्र खड्ग डमरु धर॥निजे
॥सुखला हु देगा ॥२॥ जो तिस्च
॥पत्री ताप निवारण ॥नाथ प्रभु ज
॥सपदा बुज्जा नगंगेना हु देग
॥३॥ उदारा तुझे पाये पाहु दे॥
॥सुखामधी राहु देगा ॥ध्रु॥
५३ ॥पद जंगला ताल त्रीवट॥
॥केदार मजिवन माझे ॥जेनी विजे नीच
पद तुझे॥ध्रु॥ तंतु परी जेउजं तुस
॥ही॥ मठी आकासन तुजे॥१॥ केम
॥शा तजे गा तावि ले की ॥स्थिर चेरी ता
॥परी साजे ॥२॥ लहरी वो घ तरंग जेव
॥चे॥ नाथ प्रभु जंग ते वी राजे ॥३॥ केदा
॥जीवन माझे॥ जेनी विजे॥ध्रु॥ ॥

मूळ हस्तलिखित : पृष्ठ ४४ वरील पदे

२५२८ ३७६५० १६।८।८५

# संत श्रीनाथभुजंग

## एक दिव्य जीवन - दर्शन

संसारबांधवांच्या संगतीत राहून, त्यांच्यासारखे लोक-व्यवहाराचे जीवन जगत असतानाही, अंतर्यामी आपण या सांसारिकांचे कुणाचेही न होता, केवळ भगवंताचे होऊन राहाणे, ही संतजीवनाची उफराटी महत्खूण आहे. जन्म घेतलाच आहे तर, प्रारब्धवशात प्राप्त झालेला प्रपंच एका बाजूने विलक्षण विशुद्ध अंत:करणाने करीत करीत, दुसऱ्या बाजूने साऱ्या प्रपंचालाच अंतर्यामातून परते सारून, अंतरंगी प्रभूला साठवून ठेवणे, ही संत महंतांची जगावेगळी जीवनकिमया आहे. भारतीय संस्कृतीत पुरातन काळापासून आजतागायत ही अविछिन्न परंपरा चालत आली आहे. पूर्व पुण्य फळाला आले असेल तर अशा संतांच्या अक्षर अमृतधाराप्रवाहात डुंबण्याचे भाग्यही लाभते.

महाराष्ट्राच्या धर्मसंस्कृती जीवनात असाच एक महान संत पेशवे कालात होऊन गेला. संतत्व हे तपस्वी जीवनातून फुलत असते. तिथे जातपातीचा, वर्णविचाराचा प्रश्न मुळीच संभवत नाही. ज्ञानदेव, नामदेव, जना—बहिणाई आदी संतांच्या पार्श्वभूमीवर डवरी जातीतला

एक महापुरुष मराठी मनाला लाभला. मराठवाड्यात जन्म घेतलेल्या या संताचे नाव आहे श्रीनाथभुजंग !

श्रीनाथभुजंगांच्या भक्तिप्रेमरसाने ओथंबलेल्या काव्याइतकेच त्यांचे जीवनही अतर्क्य अशा विविध घटनांनी, अदभूत व अलौकिक स्तरावर उंचावले आहे. श्रीनाथभुजंगांचे हे जीवनचिंतन भक्तभाविकांच्या हृदयाला पाझर आणणारे, पुण्यप्रद असून, संत वाङमयाभ्यासू व संगीत तज्ज्ञांना चिंतनीय व स्तिमित करणारे आहे. आणि म्हणूनच त्यांचे हे सविस्तर जीवनचित्र इथे उभे करीत आहे.

संत पुरुष ज्यांच्या पोटी जन्माला येतात, त्यांची जीवने नीतिमंत, श्रद्धाशील, सुशील, ईश्वरभक्तिपरायण असतात. अशा जीवन–सरणीमुळेच, त्यांची ऐहिक परिस्थिती कशीही असली, तरी ते 'पुण्यश्रीमंत' झालेले असतात. अशा पुण्यश्रीमंतांच्या पोटी सत्पुरुषांना जन्म देण्याचा ईशसंकेत असतो. असेच काहीसे श्रीनाथभुजंग या संताच्या बाबतीत घडले आहे.

श्रीनाथभुजंग यांच्या मातोश्री काशीबाई या पतिव्रता होत्या. ईश्वर आराधनेत त्या रंगलेल्या होत्या. आपल्याला संततीलाभ व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रभुसेवा केली. नाथभुजंगांचे वडील दादाजीराव मल्हारराव गायकवाड हे विलक्षण विशुद्ध चारित्र्यसंपन्न होते. लोक त्यांना दादानाथ म्हणत.दादानाथ-काशीबाई या दांपत्याला नवससायास करूनही पोटी पुत्रसंतान लाभले नाही; त्यामुळे त्यांचे गृहस्थधर्मीय जीवन हे एका अनामिक भावपातळीवर शुष्क बनले होते. गृहस्थधर्म विफल वाटू लागला होता.

पुण्यवंत गृहस्थांची विशेष काळजी फक्त प्रभूलाच असते,असे संतांनी म्हटले आहे. हे पुण्यवंत दांपत्य असेच फिरत फिरत करवीरनजीकच्या वाडीरत्नागिरीस ज्योतिबाच्या डोंगरास आले. भक्तिभावाने त्यांनी ज्योतिबाला आळवले. अंतरीचे मनोगत केदारनाथांजवळ मोकळे केले. पुण्यवंतांना मन मोकळे करायला आजच्या जगात तर भगवंताशिवाय जागा नाही. ज्योतिबाने त्यांचे आर्त ऐकले. ज्योतिबाने त्यांना दृष्टांत दिला की, तुला पुत्ररत्न होईल.

श्रीज्योतिबाच्या या दृष्टान्तामुळे आनंदभरल्या अंतःकरणाने काशीबाई व दादाजीनाथ मराठवाड्यास परतले. केदारनाथाच्या कृपा–छत्राखाली या दांपत्याचे गृहस्थी जीवन सफलतेच्या दिशेने जाऊ लागले. उभयतांची शुचिष्मंत जीवनसाधना व त्यात साक्षात श्रीज्योति–बाचा संकेत. असा मणिकांचन योग या कुटुंबाला लाभल्यानेच, यांचा गृहस्थधर्म सफळ करण्यासाठी श्रीनाथभुजंगांनी उस्मानाबाद जिल्ह्या–तील परांडा गावी त्यांच्या पोटी जन्म घेतला. श्रीनाथभुजंगसमकालीन संत श्री. राजाराम प्रासादी यांनी इ. स. १८३४ साली लिहिलेल्या आपल्या 'भक्तमंजरीमाला' या संतचरित्रपर ग्रंथात श्रीभुजंगनाथांचे अतिशय रसाळ व उद्‌बोधक चरित्र रेखाटले आहे. त्यात ते म्हणतात–

परांड ग्राम पुण्यशीळ । नागनाथाचे हिवरे जवळ ।
योगभ्रष्ट तेथे जन्मले । उत्तम स्थळ भूमी ते ।। ४१ ।।

माता पिता पुण्यवंत । काशीबाई दादानाथ ।
जाणुनी तयांचे मागील सुकृत । भुजंगनाथ अवतरले ।। ४२ ।।

ज्योतिबाच्या कृपाशीर्वादाने लाभलेला हा पुत्र थोडासा मोठा

झाल्यावर दादाजींनी ज्योतिबाच्या चरणी आणला आणि संकल्प सोडला की, "ज्योतिर्नाथा, हा माझा पुत्र पुढे सारे तुझेच यशोगान गाईल. देवदेवतांच्या भक्तिप्रेमात जीवन व्यतीत करील." एकुलता एक मुलगा प्रभुसेवेसाठी वाहाणे, हे फक्त अशा तप:पूत पुण्यप्रतापी पित्या--कडूनच घडत असते. श्रीचरणी संकल्प सोडून दादाजी–काशीबाई आपल्या लहान्या बाळासह सोलापूर जिल्हयातील हिवरे या गावी आले. हिवऱ्याला नागनाथांचे प्रसिद्ध मंदिर आहे. या मंदिरातच ते राहू लागले. तान्हे बाळ पाच वर्षांचे झाले. आणि तत्कालीन रीति–रिवाजानुसार पाचव्या वर्षीच श्री. जानोजीराव निंबाळकर यांच्या अंबा या बालिकेशी त्यांचे लग्न लावले. पेशवे काळी बालविवाह पद्धती रूढ होती. या रुढीनुसार पाच वर्षांचे नाथभुजंग 'बाळ' – गृहस्थी झाले. 'बाळगृहस्थ'. दैवाची ही अनाकलनीय लीला आहे.

नाथभुजंग किशोरावस्थेत येऊ लागले. त्यांचे लग्न होऊनही त्यांना कधी संसाराची पुसटतीही आसक्ती निर्माण झाली नाही. उलट नाथभुजंगांचे बाळबोध, सरळ, विमल अंत:करण प्रभुभजनात–पूजनात रंगून जाई. प्रभुसंकीर्तनात दंग होई. अशा या भावविभोर अवस्थेतच त्यांच्या बालप्रज्ञेतून देवदेवतांविषक उत्स्फूर्त काव्य प्रसवू लागले. 'बहुत सुकृतांची जोडी। म्हणून विठ्ठल आवडी।' या अबाधित, अकाट्य संतसिद्धान्तानुसार त्यांचे मन ज्योतिबा, राम–कृष्ण, विठ्ठल या देवदेवतांच्या चिंतनात अहोरात्र डुंबत जाई.

थोडी थोडी व्यावहारिक प्रौढता येऊ लागते, तोच त्यांच्या मातापित्यांचे निधन झाले. मातापित्यांचे कृपाछत्र कालौघात दुरावले त्यांच्या आईवडिलांच्या समाध्या सोलापूर जिल्हयात करमाळा येथे

आहेत. सत्शील आईवडिलांच्या निधनानंतर नाथभुजंगांचा सांभाळ बडोद्याच्या मल्हारराव गायकवाडांनी केला. नाथभुजंग ईश्वरभक्तीने अभिमंत्रित झाल्याने, त्यांचे स्थिर स्वरुपात वास्तव्य होणे अवघड होते. ईश्वरचिंतनात–गुणानुवादात–कीर्तनात रंगलेले नाथभुजंग मुक्त भ्रमंती करीत करीत हैद्राबाद संस्थानात आले. तिथला निजाम काव्य–संगीत प्रेमी होता. एक तरुण मुलगा विविध रागदारीमध्ये–तालामध्ये उत्स्फूर्त काव्यरचना करतो, हे पाहून हैद्राबादचा निजाम सलामत जंग व त्याचा पुत्र निजाम अली थक्क झाले. आणि काही काळ नाथभुजंगाला त्यांनी आपल्याकडे ठेवून घेतले.

नाथभुजंगांची ईश्वरसमर्पणशीलता, उत्कट भक्ती, देव–काव्य–निर्मिती, हे सर्व उत्कट पावन जीवन पाहून, परांडा येथील देशमुखांनी नाथभुजंग पती–पत्नीस परांडे गावच्या श्री. विठोजी भैरवनाथ या पाटलांच्या स्वाधीन केले. हे संतकुळीतले दांपत्य व पाटील यांना एकमेकांचा लळा लागला. पाटलांची त्यांच्यावर श्रद्धा बसली. आणि या सदाचारी पाटलाने नाथभुजंगांच्या जीवन चरितार्थासाठी आपल्या वतनाचा चौथा हिस्सा देऊन त्यांना कायमचेच परांड्याचे रहिवाशी बनवले. श्रीनाथभुजंगांच्या संसारातील अर्थचिंता मिटवून हे पाटील श्रीनाथभुजंगांच्या ज्ञानपुण्य–संपत्तीचे वाटेकरी झाले. धन्य ते गृहस्थी जीवन, की ज्याला संतसहवासाचा सुवास लाभला. प्रभूसाठी जीवन समर्पिलेल्या थोरांच्या जीवनचरितार्थाची काळजी प्रभूच वाहत असतो. नाथभुजंगांच्या प्रभुचिंतनात खंड पडू नये म्हणून ईश्वरालाच सजग राहावे लागले.

श्रीनाथभुजंगांना प्रारब्धाने संसार आला. या संसारप्रवाहात

जीवन कंठीत असताना त्यांना विश्वनाथ, काशीनाथ, भैरवनाथ, आप्पानाथ व कृष्णनाथ ही पाच मुले झाली. या पाचही मुलांवर श्रीनाथभुजंगांचे देवभक्तीचे संस्कार गर्भजात होते. या कुटुंबाचा प्रपंचभार प्रभूने स्वीकारला. प्रभुभक्तीत विसावलेल्या या कुटुंबातील मुलेही अशीच देवसेवेला आसुलेली होती. हे सारे पाहिले की वाटते, खरेच, श्रीनाथभुजंगांचा संसार हा परमेश्वराचा संसार होता.

श्रीनाथभुजंग विविध देवदेवतांवर उत्स्फूर्त पदे करीत. नामसंकीर्तन करीत, भ्रमंती करीत असत. वेळोवेळी तीर्थयात्रा करीत असत. या साऱ्या जीवनक्रमात दर चैत्री पौर्णिमेस ते परांड्याहून वाडीरत्नागिरीस श्रीज्योतिबाच्या दर्शनास येत. सातआठ दिवस राहून श्रीज्योतिबाचे गुणसंकीर्तन प्रेमभावाने करून परत जात.

कोल्हापूरच्या दुसऱ्या शिवाजीवर ( इ. स. १७६२ ते १८२३ ) त्यांच्या गायनाचा इतका प्रभाव पडला की, त्यांना श्रीज्योतिबावर नक्त नेमणूक करून दिली. याबाबतचे कागदपत्र आजही त्यांच्या वंशजाकडे आहेत. त्यांच्या कीर्तन गायनातील दैवी शक्तीचा प्रत्यय येऊन माधवराव पेशवे व नाना फडणीस यांनी त्यांना इनाम देऊ केले पण विरक्त नाथभुजंगांनी ते नाकारले.

श्रीनाथभुजंगांनी अनेक देवदेवता, तीर्थक्षेत्रे, नद्या, त्याचप्रमाणे वेदान्त, भक्ती, योग इत्यादी विषयांवर विविध रागदारीतील पदे लिहिली. विविध रागदारीतील असंख्य पदे लिहिणारा प्राचीन मराठी संतकवींत तर हा एकमेव संत आहे. संगीत क्षेत्रात कोणीही गुरू नसताना राग–तालाचे अत्यंत सूक्ष्म ज्ञान त्यांना कसे लाभले, हे सामान्यांना तर कोडे पडेलच. पण संगीत सृष्टीतील अतिरथी महारथींनाही हे गूढ

उकलणे मुश्कील आहे. प्रस्तुत जीवन परिचयाच्या शेवटी शेवटी नाथभुजंगांचे रागनैपुण्य दर्शवूच. या संदर्भात श्रीनाथभुजंगसमकालीन संत श्री. राजाराम प्रासादींनी आपल्या 'भक्तमंजरीमाले' त ( इ. स. १८३४ ) ८५ व्या अध्यायात भुजंगनाथांचे जे भावपूर्ण चरित्र रेखाटले आहे, ते चिंतनीय आहे. राजाराम प्रासादींच्या अनेक संतांच्या चरित्रां–तील कथांना काही अभ्यासूंनी कल्पित किंवा भाकडकथा म्हणून सहज बाजूला सारले; तरी नाथभुजंगांच्या संदर्भातील त्यांनी मांडलेला राग–दारीज्ञानाबाबतचा मुद्दा, मनोवैज्ञानिकांनाही विचार करायला लावणारा आहे. शिवाय नाथभुजंगांचे जे स्थूल देहाचे वर्णन केले आहे, तेही नास्तिक विचारवंतांना दिङ्मूढ करणारे आहे. नाथभुजंग व राजाराम प्रासादी हे समकालीन, परस्परांना पाहिलेले, भेटलेले असल्याने त्यांच्या या चरित्ररेखाटनास फारच महत्त्व आहे.

राजाराम प्रासादींनी नाथभुजंगांचे चरित्र रेखाटताना वर्णिले आहे की, नाथभुजंग हे पूर्वजन्मी कालिया नाग– काळा नाग होते. आता ही भाकड कथा म्हणून कुणीही सहज उडवून लावील. पण पूर्वजन्मांतरीच्या काळ्या नागाच्या खुणा, नाथभुजंगांच्या दैहिक व्यक्तित्वात जेव्हा ते रेखाटतात, तेव्हा मात्र मन स्तिमित होते. कालि–याचा–काळ्या नागाचा अवतार म्हणून नाथभुजंगांच्या जबड्यातील दात काळे होते. सर्पाप्रमाणेच त्यांच्याही जिव्हेला दोन शेंडे होते. सर्पाप्रमाणेच त्यांचे डोळे लाल होते. मूळ ओव्या अशा :

" काळ्याचा अवतार म्हणून । काळा दात टाळ्यांत पूर्ण ।
शेंडे जिव्हेसी दोन जाण । आरक्त नैन तैसेचि ।। ४३ ।।
काळ्यावर्ण काळा । सर्पाकृति शरीराला ।
हरिगुण वर्णायाला । देह धरिला श्रीभुजंगे ।। ४४ ।।

आता यानंतरची महत्त्वाची गोष्ट म्हणजे संगीत क्षेत्रातील कुणीही गुरू नसताना श्रीनाथभुजंगांना रागदारीचे, तालाचे हे सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञान आले कुठून? राजाराम प्रासादी लिहितात की, नाथभुजंग पूर्वजन्मी कालिया देहात असताना, श्रीकृष्णाने जेव्हा त्याचे मर्दन करून मस्तकावर मुरली वाजवीत नृत्य सुरू केले, तेव्हा आकाशातील देवदेवता गंधर्व, अप्सरा हे सारेच भूतळी येऊन नृत्य-गायन करू लागले. या सर्व प्रसंगाने कालियाचा देह धन्य झाला. कारण श्रीकृष्णाचे चरण त्याच्या मस्तकी होते. शिवाय शंकराच्या डमरूच्या विशिष्ट रागातील ताल स्वरांच्या साहाय्याने, कालिया मनापलीकडील समाधी अवस्थेत गेला. प्रासादी पुढे लिहितात.

काळ्याने ऐकुनी डउरध्वनी । तन्मयता जाहाली मनी ।
विदेहस्थिती प्राप्त उन्मनी । पूर्णपणी समाधीस्त ।। ३५ ।।

कालियाचे अंतर्बाह्य जीवन पावन झाले. या देवदेवतांचे गुण-संकीर्तन करण्यासाठी हा कालिया श्रीनाथभुजंग या संताच्या रूपाने अवतीर्ण झाला. डमरूच्या ध्वनीने समाधी अवस्था अनुभवली. त्यामुळे डवरी जातीतच जन्म घेतला.

तेणे योगे डउरे ज्ञातीत । जन्म जाला त्या भुजंगाते ।

या जन्मी नाथभुजंगांना जे रागदारीचे ज्ञान गुरुविना उपलब्ध झाले; त्याला कारण म्हणजे कालिया देहात असताना श्रीकृष्णाच्या मुरलीचे, शंकराच्या डमरूचे सारे तालसूर, तसेच गंधर्व अप्सरादिकांचे गायन ऐकले होते. त्या पूर्वस्मरणाने या जन्मी नाथभुजंगांनी विविध रागदारीत पदे लिहिली. या संदर्भात राजाराम प्रासादी लिहितात :

ताल सुर मुक्त कवन । पूर्वी ज्याचे पूर्ण ज्ञान ।
जियेकाळी श्रीकृष्ण । केले गायन मुरलीसी ।। ५४ ।।
गंधर्व तेव्हा सूर देती । अप्सरा ते आलाप करिती ।
ते सर्व भुजंगाप्रति । ज्ञान निश्चित विदित पै ।। ५५ ।।
पदरचना सुरबंद । ताल न चुके जेथे प्रसिद्ध ।
ऐसे कवन ज्याचे शुद्ध । अवतार सिद्ध काळयाचा ।। ५६ ।।

श्रीनाथभुजंग जेव्हा पंढरपूरला गेले, तेव्हा त्यांचे नर्तन गायन–कीर्तन ऐकून श्रोते आश्चर्यचकित झाले. एवढेच नव्हे तर अंतरिक्षस्थ ऋषिमुनीवरही मंत्रमुग्ध झाले. तेव्हा प्रत्यक्ष पांडूरंगच या सर्वांना जे सांगतो, त्याबाबत श्री राजाराम प्रासादी लिहितात :

श्रीहरी म्हणती सनकादिका । हा काळयाभुजंग संत देखा ।
आलाप छंद सुंदर निका । मागील आवाका स्मर्णाचा ।। ७४ ।।
यमुनातीरी वनात । खेळ खेळलो आम्ही तुम्ही ते ।
ते सर्व जया विदित । मुरली शब्दाते जाणतसे ।। ७५ ।।
रवितनयेच्या राहुनी जीवनी । येणे ऐकिले जे जे श्रवणी ।
ते ते बोलतो सुंदर वाणी । केला कीर्तनी बहुरस ।। ७६ ।।

या सर्व वर्णनावरून नाथभुजंगांना रागदारीचे ज्ञान हे पूर्वजन्मी–चेच आहे, हे सिद्ध होते. आज परामानसशास्त्रही मान्य करते की, पूर्वजन्मींचे स्मरण होऊ शकते. सामान्य माणसाच्या बाबत ही जर घटना घडत असेल, तर श्रीनाथभुजंग हे तर महान संत. मग त्यांना तर पूर्वजन्मींचे स्मरण सहज सहजच होईल. आपल्याकडील संत बहिणाबाईने मृत्यूसमयी आपल्या मुलास स्वतःच्या तेरा पूर्वजन्मांचा

तिहास सांगितला होता, याचीही इथे आठवण होते.

संत श्रीनाथभुजंगांचे कीर्तनातील गायन–नर्तन सामर्थ्य इतके होते की, पंढरीच्या विठ्ठलाने त्यांना कडकडून मिठी मारली. नाथभुजं–गांनी पंढरपूरला विठ्ठलाच्या भेटीस जाण्याचा, विठ्ठलाने प्रेममिठीत घेतल्याचा, कीर्तनात रसरंग भरल्याचा प्रसंग राजाराम प्रासादींनी इतक्या तन्मयतेने रंगवला आहे की, संत नामदेवांच्या कीर्तनरंगाची आठवण व्हावी. या नाथयात्रेत स्वतः राजाराम प्रासादीही होते; हे अनेक ओव्यांतून स्पष्ट दिसते. उदा. नाथभुजंग शिष्यमंडळीसमवेत पंढरीस जाताना नाथभुजंगांच्या अवस्थेचे चित्रण करताना ते म्हणतात :

मार्गी चालता उभे राहावें । पांडूरंगाचें ध्यान करावें ।
ताटस्तता होय स्वभावें । काय वैभव वानू ते ।। ६५ ।।

त्यांच्या रागदारीतील पद-श्रवणाचा परिणाम रेखाटताना प्रासादी म्हणतात :

मानवी धरुनी शरीर । काव्य केले तैसेचि सारे ।
ऐकताचि मन विरे । वृत्ति नुरे देहावरी ।। ५१ ।।

लाख लाख लोकांतून नाथभुजंगासारखा संतभक्त जेव्हा विठ्ठ–लाच्या पायाला अश्रूभरल्या नयनांनी मिठी मारतो, तेव्हा शांतस्वरूप विठ्ठलही आनबाहेर सुखावतो. अवघ्या एकदोन ओव्यांतून हे सारे अक्षरचित्र राजाराम प्रासादी उभे करतात ते असे :

राउळात प्रवेश करिता । भरले वारे अंगी भक्ता ।
येकायेकी विदेह अवस्था । दृष्टी पाहाता शामसुंदर ।। ६७ ।।

समचरणी घालिता मिठी । भुजंगा धरिती देव पोटी ।
उभयता बोलती गुह्य गोष्टी । रुक्मिणी निकटी जवळ ते ।।६८।।

आणि मग नाथभुजंगांनी ' हातात डौर घेऊन ' कीर्तनात असा प्रेमाचा रंग भरला की,

भक्त मुमुक्षु विषयी । तन्मय झाले कीतनठाई ।
डउर वाजे अनुहातघाई । थयथया पाई नाचतसे ।। ७३ ।।

सनकादी संत व विठ्ठल तर या कीर्तनरंगाने वेडावून गेले. विठ्ठलाने तर हा प्रेमरसकल्लोळ अनुभवण्यासाठी श्रीनाथभुजंगांना आपल्याजवळ काही काळ ठेवूनच घेतले. पारंपरिक कीर्तनपरंपरेच्या अभ्यासंनी अशा पद्धतीच्या कीर्तनाचीही दखल घ्यायला हवी.

पंढरपूरहून श्रीविठ्ठलाची आज्ञा घेऊन नाथभुजंग अशीच तीर्थ-यात्रा करीत ठिकठिकाणी गेले. ज्या ज्या ठिकाणी जी जी देव-देवता असेल, तिच्यावर त्यांनी उत्स्फूर्त पदे लिहिली.

' जो जो देव दृष्टीस पडला । तो तो कवनोक्ति पूजियेला । '

नाथभुजंगांचे डउर वादनाचे कौशल्य असे होते की श्रवणासाठी साक्षात देव प्रकटायचा.

श्रीनाथभुजंगांच्या स्वानुभव रसाने ओथंबलेल्या, भक्तिप्रेमाने परि-प्लुत अशा पदांचे महिमान राजाराम प्रासादींनी मांडले आहे ते असे :

ऐसे काव्य भुजंगनाथांचे । कर्णी पडता अघ जाय साचे ।
पदे म्हणता सहजी वाचे । हरे जिवाचे दुःख पै ।।५३।।

विषबाधा नुरे साचि । पदे म्हणता भुजंगनाथाची
सकळ कामना पुरे जीवाची । कैवल्याची प्राप्ती पै ।। ५९ ।
जेथे जेथे भुजंग काव्य । भुजंगाचे नाही भय ।
ऐसे भगवान वदती स्वयें । साधुवर्य कलीमाजी ।। ६० ।।
वाजविता जेणे डउर । प्रगट होय शारंगधर ।
भूतपिशाच्च पळे त्वरे । निरसे ज्वर भवबाधा ।। ८२ ।।
भुजंगनाथ स्मरता वाणी । भुजंग जाती स्थान सोडुनी
चमत्कार प्रत्यक्ष जनी । संत मेदिनी काळचा तो ।। ८३ ।।
काव्यामृत सेविता जनी । दुरीत रोग गेले निघोनी ।
भुजंग अंश तो अवनी । आठवा मनी नाथभुजंग ।। ८७ ।।
जे जे जयाचे मनोरथ । ते ते पुरवी भुजंगनाथ ।
धन्य साधु कलीयुगात । दर्शन देत भाविका ।। ९७ ।।

संत श्रीनाथभुजंगांचे त्या काळातले हे अतुलनीय व्यक्तित्व अनुभवूनच, चिन्मयदास जगन्नाथाने १८१८ साली पूर्ण केलेल्या आपल्या 'भक्ति-पंथ' या ग्रंथातील संत नामावळी प्रकरणात

'नाथभुजंग गोसावी । डौर वाजवी अनुहात ।'

असा गौरवाने उल्लेख केला आहे. (प्रस्तुत ग्रंथ अद्याप अप्रकाशित असून डॉ. ग. वा. तगारे यांच्या संग्रही त्याबाबतचे संदर्भ आहेत.)

ज्यांच्या प्रेमरसपरिप्लुत पदांनी पंढरीचा पांडूरंग प्रफुल्लित झाला, ज्यांच्या वेगवेगळ्या रागदारींतील आलापांनी सनकादी संतांना वेडावून टाकले, ज्यांच्या ब्रह्मरसानुभूतीसंपन्न गुणसंकीर्तनाने

भक्त-मुमुक्षू-विषयी जनही तन्मय होऊन उद्धरून गेले, ज्यांच्या स्तुती कवनश्रवणाने केदारनाथादी देवदेवतांनाही ज्यांचा सहवास हवाहवासा वाटला, ज्यांचे सारे अमृतमय अनाकलनीय दिव्य जीवन–काव्य एकरसून अनुभवून, समकालीन संत श्री राजाराम प्रासादींनी

जे जे जयाचे मनोरथ । ते ते पुरवी भुजंगनाथ ।
धन्य धन्य साधु कलियुगात । दर्शन देत भाविका ।।९७।।

असे सार्थ भावोद्गार काढले; तो डौरी गोसावी जातीतला संतश्रेष्ठ गेली दीडशे वर्षे कळत–नकळत अप्रकाशित राहिला, हे जाणत्यांचे, भाविकांचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

नाथभुजंगांचा प्रारब्धवशात इकडे मुलाबाळांचा संसार झाला; तर तिकडे पूर्वपुण्याईचे सत्त्वप्रधान पाथेय पाठीशी घेऊन बलवत्तर प्रयत्नाने त्यांनी सफल परमार्थ केला. बालदशेपासून सिद्ध अवस्थे–पर्यंत सारे जीवन आतळ ढवळून निघाले. अशा या परमसाक्षात्कारी नाथभुजंगांनी मराठवाड्यातील परांडे गावी राहात, ठिकठिकाणी भ्रमंती करीत, आयुष्यभर देवदेवतांची पदे गाईली. त्यांच्या वडिलांचा संकल्प सिद्धीस गेला. नाथांचा प्रपंच हाच परमार्थ झाला. अंतर्यामी पूर्ण अनासक्त असलेल्याचा प्रपंचच कसा परमार्थस्वरूप होतो, याचे नाथभुजंग हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

अशा या थोर विभुतीचे मनस्वी मरणही त्यांच्या सुवासिक काव्यासारखेच होते. आपले जीवनकार्य संपल्याची जाणीव होताच, एके दिवशी त्यांनी आपल्या काशीनाथ नावाच्या मुलाला बोलावून घेतले. त्याची मांडी मागितली. त्याच्या मांडीवर डोके ठेवून त्यांनी

'तेहि गेले बा' हे शेवटचे पद म्हटले. या पदाचा 'हर हर म्हणता नाथभुजंग तेहि गेले बा' हा अंतिम चरण म्हणताच, या देहातून ते निघून गेले. मृत्यूपूर्वी त्यांनी आपल्या घरी सांगून ठेवले होते की, तिसऱ्या दिवशी तुम्हांस मी चितेवर पुन्हा दर्शन देईन. त्यानुसार स्मशानभूमीत तिसऱ्या दिवशी चितेवर सर्वांना दर्शन देऊन अदृश्य झाले. धन्य ते जीवन ! धन्य तो संसार !

संत श्रीनाथभुजंग यांच्या जीवनाचा कालावधी पाहाता विविध ग्रंथांतून विविध नोंदी आढळतात. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने इ. स. १९७७ मध्येप्रकाशित केलेल्या 'मराठी वाङ्मय कोश' खंड १ मध्ये, नाथभुजंग या शीर्षकाखालील नोंदीत अंदाजे इ. स.१८३० मध्ये म्हटले आहे. तर त्याच ग्रंथात 'भुजंगनाथ' या शीर्षकाखालील नोंदीत इ. स. १८२३ सांगून, जन्मकाल अनिश्चित असल्याचे नोंदले आहे. खरे तर हे स्वतंत्र दोन संत नाहीत. या दोन्ही ठिकाणच्या नोंदी एकत्र यायला हव्या होत्या. इ. स. १८३४ मध्ये लिहिलेल्या राजाराम प्रासादींच्या 'भक्तमंजरीमाले' च्या तिसऱ्या खंडात यांचा समाधीकाल

शके सत्राशे पंचेचाळीसात । जाले नाथ समाधिस्त ।
द्वादशी तिथी विष्णूव्रत । जड देहाते विसर्जिले ।

अशा पद्धतीने नोंदविला आहे. म्हणजे राजाराम प्रासादींच्या मते त्यांचा निर्वाणकाळ इ. स. १८२३ आहे; तर सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. मु. गो. गुळवणी यांनी १९ जून, १९७७ च्या 'दै. पुढारी' मधील लेखात नाथभुजंग यांची वंशावळ मांडताना

नाथभुजंगांचा काळ इ. स. १७५० ते १८३५ असा नोंदला आहे. त्यांनी पुढीलप्रमाणे वंशावळ दिली आहे.

## श्री नाथभुजंगांची वंशावळ

दादाजी मल्हारराव गायकवाड

↓

श्रीनाथभुजंग (इ स.१७५० ते १८३५)

↓

विश्वनाथ | काशीनाथ | भैरवनाथ | अप्पानाथ | कृष्णनाथ

काशीनाथ ↓

गंगानाथ | नाथबुवा | बुवानाथ

नाथबुवा ↓

गणुबुवा

↓

जंगलबुवा

↓

ज्योतिनाथ

श्रीनाथभुजंगांचे विद्यमान वंशज जंगलबुवा हे परांड्यास राहातात. दरवर्षी ते चैत्री पौर्णिमेस श्रीज्योतिबाच्या यात्रेस येतात व ज्योतिबासमोर आपली गायनसेवा रूजू करतात. चैत्री पौर्णिमेदिवशी जंगलबुवा आपले पूर्वज संत श्रीनाथभुजंगविरचित श्रीज्योतिबाची पदे गातात. या सेवेबद्दल पूर्वापार चालत आलेल्या सरकारी परंपरेनुसार

श्रीज्योतिबाचा प्रसाद म्हणून त्यांना श्रीज्योतिबाच्या अंगावरील मानाचे धोतर, नारळ व पानाचा विडा दिला जातो. या जंगलबुवांच्या–कडूनच सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. मु. गो. गुळवणी यांनी त्यांच्या घरची काही ऐतिहासिक कागदपत्रे पाहिली व नाथभुजंग यांच्या पदांचे हस्तलिखित मागून घेतले. या हस्तलिखिताबाबत इ. स. १९ जून १९७७ च्या दै. ' पुढारी ' मधील लेखात श्री. गुळवणी पुढीलप्रमाणे लिहितात, " काव्याची वही १७ इंच लांब व ४ इंच रुंद आहे. कागद जुना जुन्नरी आहे. वहीची एकूण पाने १२८ असून, पहिली १ ते १४ व शेवटची १७ पाने अर्धी फाटून गहाळ झालेला आहेत. व मधली ९७ पाने चांगली आहेत. शाई काळी व लिपी देवनागरी आहे. यात एकूण ३०४ काव्ये आहेत. त्यांतील केदारमाहात्म्य, संस्कृत श्लोक, आरत्या, केदारचरित्र अशा १५–१६ सोडल्या तर अंदाजे २८० काव्ये फारच सुरेख आहेत. ३–४ पदे हिंदीत आहेत. प्रत्येक काव्याच्या शेवटी कवीने ' नाथभुजंग ' असे नाव नोंदविले आहे. काव्याची भाषाही बोली भाषा असल्याने बराच अशुद्धपणा त्यात आढळतो. "

श्रीनाथभुजंग यांची केवळ ज्योतिबावरील पदे प्रसिद्ध कर–ण्याच्या दृष्टीने हे हस्तलिखित श्री. गुळवणी यांच्याकडून मी मागून घेतले. आणि यातील ६१ पदे आमच्या ' पश्यंती विद्या वलय ' या आध्यात्मिक–सांस्कृतिक संस्थेमार्फत प्रकाशित झालेल्या ' पैलतीर ' या पहिल्याच दिवाळी वार्षिकात इ. स. १९८४ मध्ये प्रसिद्ध केली. हीच पदे प्रस्तुत पुस्तकरूपाने संत श्रीनाथभुजंग यांच्या विस्तृत जीवन–परिचयासह आज चैत्री पौर्णिमेस दि. ५–४–१९८५ रोजी प्रकाशित होत आहेत.

मूळ हस्तलिखितात प्रत्येक पदाच्या शिरोभागी त्या पदाचा राग

व ताल नोंदला आहे. अनेक पदांमधून अधूनमधून एक ते चार चरणां–पयत आलाप येतात. मला संगितातले यत्किंचितही ज्ञान नसल्याने त्याबाबत मी काहीही लिहू शकत नाही. प्रस्तुतच्या पुस्तकात पदांच्या मर्यादेमुळे काही थोडेच राग आले आहेत; परंतु संगीत तज्ज्ञांच्या चिंतनासाठी मूळ हस्तलिखितातील पदांच्या शिरोभागी जे राग–ताल येतात, त्यांपैकी पुनरावृत्ती टाळून जवळजवळ सर्वांची नोंद इथे जशीच्या तशी करीत आहे. मूळ हस्तलिखितात बोलीभाषा असून बरीच अशुद्ध शब्दरूपे येऊन जातात.

| | |
|---|---|
| १) कबित राग कल्याण ताल सुर फाक्ता | २) श्रीधना श्रीराग पद मुल-तानी धनाश्री |
| ३) खमाचे | ४) जंगला त्रिवट |
| ५) कबीत्तरसबीलास | ६) ठोंबरी ताल त्रिवट |
| ७) धृपद सारंग | ८) जंगला बिलंदी |
| ९) कल्याण एक ताल | १०) कल्याण बिलंदी |
| ११) गीत भूप कल्याण, ताल झपताल | १२) जंगला रूपक ताल |
| १३) आनंद भैरवी ताल त्रिवट | १४) अभंग मधुमाधवी |
| १५) कल्याण मध्यताल | १६) साळोक राग |
| १७) राग ललत ताल त्रिवट | १८) ताल लंगडी बिलंदी |
| १९) अभंग ताल त्रिवट रागिणी आनंद भैरवी | २०) पंजाब ताल त्रिवट |
| २१) काफी जंगला | २२) देसवाली जयजयवंती ताल त्रिवट |
| २३) दर्बारी ताल सूर फाक्ता | २४) सोरठ राग |

२५) जोगी राग ताल त्रिवट
२६) राग तोडी त्रिवट
२७) झिंझोटी रागणी
२८) गझल ताल बिलंदी
२९) कल्याण हमीर, हामीर येताला
३०) कवित्त राग आडाना
३१) कानडा दरबारी ताल त्रिवट
३२) काफी झिंझोटी
३३) बिनराग काफी पद
३४) राग पंचम सूर फाक्ता
३५) बसंत राग हींडोर सूर फाक्ता
३६) ठुंबरी ताल त्रिवट
३७) केदार रागणी ताल त्रिवट
३८) होरी राग मुलतानी धनाश्री
३९) आडाना रूपक
४०) पुर्वि ताल बिलंदी
४१) परजे रागणी
४२) यमन ताल त्रिवट
४३) हामिर कल्याण
४४) भैरव राग ताल त्रिवट
४५) मुरली रव प्रबंद अन्नं भैरवी
४६) सोरठ मल्हार
४७) झिंझोटी ताल त्रिवट
४८) पारजे ताल झेंपा
४९) राग सोहनी, चौताला
५०) राग मालकंस
५१) रागणी जेयेताश्री रूपक
५२) कांबोध ताल बिलंदी
५३) जोगी ताल त्रिवट
५४) कल्याण छाया नाट
५५) यमन कल्याण ताल त्रिवट
५६) भासा कानडी
५७) पंचम धुमाळी
५८) आदी वैराळी मध्यताल त्रिवट ताल फेर
५९) प्रबंध कांबोध रूपक
६०) गुजरी ताल त्रिवट
६१) बिहाग बिलंदी
६२) बागेसरी
६३) कल्याण तराणा
६४) कमोद कल्याण

६५) मल्यार सूर फाक्ता
६६) रवट राग ताल त्रिवट
६७) आसावरी ताल त्रिवट
६८) गौड सारंग ताल त्रिवट
६९) केदार नाट एकताल
७०) पंकज राग
७१) ललत ताल त्रिवट
७२) छंद कटीबंद ताल त्रिवट
७३) प्रबंध हामि कल्याण ताल रूपक
७४) प्रबंध हामिर रूपक

प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने श्रीनाथभुजंगांची पदे प्रथमतःच मराठी वाचकांसमोर येत आहेत. त्यांची सारीच रचना प्रकाशित होण्याच्या दृष्टीने संशोधकांनी लक्ष घालायला हवे. या पुस्तकात श्री. मु. गो. गुळवणी यांच्याकडून मिळालेल्या मूळ हस्तलिखितातील फक्त श्रीज्योतिबावरील पदेच निवडली आहेत. मूळ हस्तलिखित अत्यंत जीर्ण स्वरूपात असल्याने, त्या वहीत जी पदे पूर्ण रूपात उपलब्ध झाली, तेवढीच घेतली आहेत. मूळ हस्तलिखितातील ओळीं–मध्ये शब्द तोडलेले नसल्याने व कित्येक ठिकाणी अशुद्ध शब्दरूपे असल्याने, अत्यंत काळजीपूर्वक संपादन करावे लागले आहे. मूळ आशयास यत्किंचितही धक्का न लावता, पदांतील मूलगामी अर्थ ध्यानी यावा म्हणून क्वचित ठिकाणी संस्करण केले आहे. जिथे शब्दांतील अक्षर गळले आहे तेथे (x) अशी फुली केली आहे. मुद्रण प्रत तयार करताना जुने शुद्धलेखन स्वीकारले आहे. ही पदे निवडताना व त्यावर संस्कार करताना महाराष्ट्रातील ख्यातनाम संशोधक–चिंतक–लेखक डॉ. रा. चिं. ढेरे यांच्याशी सविस्तर चर्चा केली आहे. त्यांच्याशी झालेली चर्चा व मार्गदर्शन बहुमोलाचे आहे.

श्रीनाथभुजंगांचे लेखन प्रकाशित स्वरूपात जवळ जवळ नाहीच

म्हटले तरी चालेल. मराठी वाङ्मय कोशातील संदर्भ किंवा प्राचीन मराठी संत कवी चरित्रमाला किंवा प्राचीन मराठी पदसंग्रह पाहिले तर दोनचार पदांपलीकडे प्रकाशित वाङ्मय नाहीच, हे दिसून येईल. श्री. ज. र. आजगावकरांनी निर्विवादपणे नाथभुजंगांचे असे फक्त एकच पद प्रसिद्ध केले आहे. श्री. आजगावकर नाथभुजंगांचे एक सुप्रसिद्ध पद छापणार होते; पण ते न छापण्याचे कारण देताना म्हणतात, ' पाठांतरामुळे त्याचे मूळ शुद्ध स्वरूप इतके विकृत झालेले आहे की, तसल्या स्थितीत त्याचे येथे अवतरण करणे मला योग्य वाटत नाही. ' या पार्श्वभूमीवर नाथभुजंगांच्या घरातील मूळ हस्तलिखितावरून प्रस्तुत पुस्तकातील पदे प्रथमतःच प्रकाशित होत असल्याने, ती मोलाची ठरतील यात संशय नाही. मूळ हस्तलिखितातील एका पदाचा ब्लॉक प्रस्तुत पुस्तकात टाकला आहे.

आमच्या ' पश्यंती विद्या वलया ' चे आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्य पाहून इतिहास संशोधक श्री. मु. गो. गुळवणी यांनी श्रीनाथभुजंगांचे मूळ हस्तलिखित अत्यंत प्रेमाने दिले आणि या संदर्भात त्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने चर्चा केली. श्री. गुळवणी यांचा व त्यांच्या 'श्रीशिवसंस्कृति मंडळा' चा मी अत्यंत ऋणी आहे.डॉ. रा. चिं. ढेरे (अण्णा) यांचे मौलिक मार्गदर्शन व सक्रिय साहाय्य, माझ्या आवडीच्या क्षेत्रातील वाटचालीस सदैव गती देत असते. त्यांचाही मी अत्यंत ऋणी आहे. श्रीनाथभुजंगांचे विद्यमान वंशज श्रीजंगलबुवा यांचेही प्रस्तुत कार्यात भावबंध आहेत. त्यांच्या छायाचित्राचा ब्लॉक प्रस्तुत पुस्तकात आहे. त्यांचेही ऋण इथे व्यक्त करतो. नवरंग मुद्रणालयाचे मालक श्री. पी. के. सरनोबत ( अण्णा ) यांनी आमची आजपर्यंतची सर्व

कामे विलक्षण जिव्हाळयाने केली आहेत. अण्णांच्या जिव्हाळयातूनच प्रस्तुत पुस्तकही इतक्या सुबक स्वरूपात प्रकटले आहे. अण्णा, बाळासाहेब व नवरंग मुद्रणालयातील सर्व सेवकवर्ग या सर्वांचा मी आभारी आहे. तसेच प्रस्तुत पुस्तक प्रकाशनासाठी माझे सन्मित्र श्री. कों. ना. आंबेकर यांनी स्वेच्छेने व प्रेमाने आर्थिक साहाय्य करून उपकृत केले, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

शेवटी उत्कट प्रेमस्मरण होते ते ज्यांची ही काव्यकृती आहे, त्या संतश्रेष्ठ श्रीनाथभुजंगांचे. हे संतश्रेष्ठा, या पद प्रकाशन कार्यात आपलीच कृपाशक्ती आहे, हे वेगवेगळया रूपाने अनुभवले आहे. अशीच प्रेमचरणसेवा लाभावी, ही विनवणी आणि हे कुलस्वामी श्रीज्योतिर्नाथा, आपली सेवा करीत आपल्या प्रेमभक्तीत अक्षय विसावा द्यावा, ही प्रेमप्रार्थना.

## लेखन--आधार


१) संत श्रीनाथभुजंग यांची पदे (मूळ हस्तलिखित)

२) प्राचीन मराठी संतकवी : ले. ज. र. आजगावकर
(खंड तिसरा) प्रकाशक : कोकण मराठी रिसर्च इन्स्टिटच्यूट, मुंबई (१९८०)

३) श्रीभक्तमंजरीमाला : ले. राजाराम प्रासादी
(खंड तिसरा) प्रकाशक : सत्कार्योत्तेजक सभा-धुळे (१९३२)

४) मराठी वाड्.मय कोश : संपादक : गं. दे. खानोलकर
(खंड पहिला) प्रकाशक : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ (१९७७)

५) महाराष्ट्र सारस्वत : ले. वि. ल. भावे पुरवणी–शं. गो. तुळपुळे
प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन
पाचवी आवृत्ती (१९६३)

६) मराठी वाड्.मयाचा इतिहास : संपादक : रा. श्री. जोग
(खंड तिसरा) प्रकाशक : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (१९७३)

७) लेख– एक संत कवी नाथभुजंग : ले. मु. गो. गुळवणी
दै. पुढारी, १९ जून १९७७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ क्रमांक

# श्रीज्योतिबाची पदे

## ( संत श्रीनाथभुजंग—विरचित )

।। श्री सौदागर प्रसन्न ।।

**१) केदारा तुझे पाय पाहूं दे**

**(पद कल्याण मध्य ताल)**

केदारा तुझे पाय पाहूं दे । सदा सुखामध्यें राहूं दे ।।
श्रीरेणुकारमण अघशमना । हयगमना रिपुमदना त्वत्पदीं ।।
नमनानें मन सुमना । सत्वर वाहूं दे गा ।।१।।
रत्नागिरिनिवासा बा । खळेशा शेषारूढ चतुर्भुजा ।।
त्रिशूल पात्र खड्ग डमरूधर । निजसुख लाहूं दे गा ।।२।।
ज्योतिस्वरूप त्रितापनिवारण । नाथभुजंग पदांबु ज्ञानगंगें
नाहूं दे गा ।।३।।
उदारा तुझें पाय पाहूं दे । सदा सुखामध्यें राहूं दे गा ।।

**२) केदारा जीवन माझें**
**(पद जंगला ताल त्रिवट)**

केदारा जीवन माझें । जनीं विजनीं व्यापक रूप तुझें ।।
तंतु पटीं जड जंतू सबाहीं । घटीं मठीं आकाश न दुजें ।।१।।
हेम नगांत जगांत विलोकी । स्थिरचरीं तव पदी साजे ।।२।।
लहरी वोघ तरंग जळाचे । नाथभुजंग तेवीं राजें ।।३।।

**३) नयनाच्या नयनातें निज नयनीं**
**( पद ठुंबरी ताल त्रिवट )**

नयनाच्या नयनातें निज नयनीं । निरखिलें रूप ।
डोळियाचा डोळा । तमाळसुनीळा । धगधगित तेज तद्रूप ।।१।।
त्यावरी वेल्हाळा चमकचपळा । तत्परात्पर तेंचि चिद्रूप ।।२।।
भू नव्हे अनळ वायू नोहे जळ । नभ पोकळ अरूपारूप ।।३।।
ते देखोनी श्रुती परतल्या माजी । नाथभुजंग ज्योतिस्वरूप ।।४।।

**४) केदार उदार तुम्ही जगीं ।**
**(गीत ताल रूपक)**

केदार उदार तुम्ही जगीं । आधार भवसिंधू तराया ।
द्याया ज्ञानरवीचा प्रकाश । मोहतिमिर हराया ।
स्वसुखा निज भजन कराया । गा गा रि ग मा गा रि स ।

स र सा रि ग म ग रि स गा या । गा ई या ई या अ आ
आ आ अ अ अ आ परब्रह्म अवतार ।।
सौदागर श्रीनाथराया । मायबाप करुणासागर नटनागर
चतुर्भुज या ।
दरुशन द्या करुनि बापा । जाग जाग ज्योतिस्वरुपा ।
उशीर न करी त्रिभुवन भूपा । नाथभुजंग अनाथ त्वत्पदीं ।
नाथ करी मम सखया । अे त्यै ये त्यै यं व (ब) या ।
रे रे ति अै यं व या । आ आ अ अ अ उ आ आ अ उ अ अ अ आ ।
परंब्रह्म अवतार केदार ।।

## ५) जिवलग जिवीचा
## (पद जंगला बिलंदी)

जिवलग जिवीचा । धनी नाथ आमुचा ।।

सहस्त्रमुखाचा । श्रमली वाचा ।
न वर्णवे चतुर्भुज । अनंत नामाचा ।।१।।

नाथभुजंग मी । पार न याचा ।
निवडिले सकळ सार । आगमा निगमाचा ।।२।।

## ६) नमन सद्‌गुरु संतां मुनी महंतां
## (अभंग)

नमन सद्‌गुरु संतां मुनी महंतां । दत्त अवधूता दिगंबरा ।।१।।
नमू सरस्वती देवा विनायका । त्रिजगव्यापका जोतिराया ।।२।।

मायबाप श्रोतीं सज्जनाचे पायीं । ठेवोनिया डोई विनवितो ।।३।।
नाथभुजंगाचे कीर्तनीं रंगावें । रामकृष्ण गावें वेळोवेळां ।।४।।

**७) आतां तारी तारी श्रीनाथराया**
**(पद कल्याण बिलंदी)**

आतां तारी तारी श्रीनाथराया । आतां तारी ।। धृ. ।।
संपत्तीचें जग आणि सुत दारा । काय करूं इतरां या ।।१।।
सर्व सुखाचीं, अंतीं न येती । भवनदी उतराया ।।२।।
नाथभुजंग मी दीनदयाळा । तुज विनवी भवाब्धि तराया ।।३।।
आतां तारी तारी नाथराया ।।

**८) अहो ज्योतिरूपा जगद्‌गुरु**
**(श्रीगीत भूपकल्याण ताल झपताल**

अहो ज्योतिरूपा जगद्‌गुरु जगतारका मायबापा ।
तारी तारी महावारी भवसिंधु हा ।
घोर करी पार नरदेह तापा । अहो नाथरूपा ।।
येई येई सख्या देई निजदर्शना ।
स्पर्शले पाप संताप जाळीत । अनुताप होई ।।
विनयें विनवी नाथभुजंग लागोनी पायीं ।
स री गा ग म प ध नी सा स री ग म
प ध नी सा स री ग री ग सा ।।
अै ये त्यै यै ये त्यैं यै यै ई या ई या ।।

अ अ अ आ आ अ  आ आनंद केदार ज्यीतीस्वरुपा ।।
देई सत्संग पथ होय सोपा ।।

**९) श्रीनाथरूपा रे रे**
**(पद जंगला रूपक ताल)**

श्रीनाथरूपा रे रे । श्रीनाथरूपा ।।

नाथजी अनाथबंधू सनाथ हो । भवभ्रांती वारी तूं ।।
तारी करी निजपंथ सोपा रे रे ।।१।।

बाप माय तूं पाय दाखवी । काय पाहसी राहुनी दुरी ।।
ध्यायी नाथभुजंग प्रभू त्रिभुवन भूपारे रे ।।२।।

**१०) श्रीनाथ केदार**
**(कल्याण एक ताल)**

श्रीनाथ केदार । तुझा मजशी आधार ।
दक्षिणपती केदार ।

भजन पूजन तव सेवा कठीण खड्‌गधर ।
नुमजे कांहींच मजला पडला मोहअंधार ।।१।।

पुण्य पाप सुख दुःख निर्मिलेंसी तुळाधर ।
नातळे दोहींस तूं राहुनी निराधार ।।२।।

नाथभुजंग निजसखा जिवलग जगदोद्धार ।
जनन मरण तारी वारी हा निश्चयें निर्धार ।।३।।

## ११) उदारा स्वामी सद्‌गुरूचे पाय पाहूं
### (पद कल्याण मध्यताल)

उदारा स्वामी सद्‌गुरूचे पाय पाहूं ।।
स्वात्मविचार विचारुनी घेऊं । निजसुख अंतरीं लाहूं ।।१।।
सगुण ध्यान धरुनि पूजेला । करुनी सुमन मन वाहूं ।।२।।
नाथभुजंग सुसंगती योग । लवुनी अचळ पदीं राहूं ।।३।।

## १२) श्रीशिवज्योतिस्वरूपं वंदे
### (पद साळोक राग)

श्रीशिवज्योतिस्वरूपं वंदे । केदारनाथरूपम् ।।
पाहि मां करुणालय जयजय । पालय पालय त्रिभुवनभूपम् ।।१।।
तुरगगमन अघशमन दमनरिपु । त्वत्पदीं नमन दक्षिणाधीपम् ।।२।।
नाथभुजंग अनाथ पतित । त्वप्रसाद वितरण भवाब्धि–आप ।।३।।

## १३) रेणुकारमणा रवळेशा
### (पद राग ललत ताल त्रिवट)

रेणुकारमणा रवळेशा श्रीनाथा पाहि माम् ।

उत्तरेस त्यजुनी सहवासा आगमन दक्षिणे प्रवासा ।
निवास कृत संरक्षण निर्जर । पक्षी लक्षे रत्नासुरदमना ।।१।।

अनुपम्य अगुण अरूपा । परमेश्वर ज्योतिस्वरूपा ।।
भूपा त्रिजगदुत्पत्ती विश्ववंद्या । नारायण कलिमल-अघशमना ।।२।।

केदार उदार सुहृदया । कोमल सज्जनासी सदया ।।
दयाघना दुर्घट सकंटका । निकट वास त्वच्चरणीं नमना ।।३।।

गुरु नाथभुजंग वरदा । सांभाळी आपुल्या बिरुदा ।।
वृंदसमोह त्वं सौदागर । पदाब्जि शष्टदलु मम मना ।।४।।

रवळेशा श्रीनाथा पाहि माम् । रेणुकारमणा ।।

**१४) नाथा तुझे पायीं माझें निजधन**

**श्रीनाथाचा अभंग**

**(ताल लंगडी बिलंदी)**

नाथा तुझे पायीं माझें निजधन सापडलें ।।
तेणें जालों सुखी न कधीं संकट पडलें ।।१।।

ऐसें नोव्हे स्वामी केदारा उदारा दीनबंधू ।।
पतीत पावन नाम दयाघन सुखसिंधू ।।२।।

चोर जार तरले कीं अपार नामाचा पवाडा ।।
सांभाळावे ब्रीद ना तरी होईल भंडवाडा ।।
अजामीळ वाल्या पतित गणिका उद्धरिली ।।
पावन ज्योतिस्वरूपा मी कास तुझी धरली ।।३।।

ऐसे नोव्हे स्वामी केदारा उदारा दीनबंधू ।।
त्राहे जाला (x) जिव येउनिया आतां झडकरी ।
नाथभुजंगाचा शेवट सखया गोड करी ।।४।।

## १५) पतीत मी हरी पावन हो
(पद लंगडी बिलंदी)

पतीत मी हरी पावन हो । किंवा सोडी ब्रीद पिटीन डांगोरा
नोव्हेसी पावन हो । नाथराया नोव्हेसी पावन हो ।।१।।

नाना कर्मीं लिप्त करूनि मजसी दाखविलें संचित ।।
त्रिजगव्यापका लपुनी रहासी । नोव्हे तुझें उचित ।।
जोतिराया नोव्हे तुझें उचित ।।२।।

गज गणिका आज्जे कुंटिनी चांडाळी वाल्मीका उद्धरिलें ।
वाल्मीका उद्धरिलें ।।
तारक तू श्रुतिशास्त्र गुरुमुख । पाय तुझे धरिले ।।३।।

पापाचे पर्वत जाले मजवरी गणित न सापडे ।
चोर जार जागृती स्वप्न सुषुप्ती बोलतां मौन पडे ।।४।।

त्राहे त्राहे आतां पाहे दीनाकडे येउनि झडकरी ।।
नाथभुजंगाचा तुजवीण कोण शेवट गोड करी ।।५।।

## १६) रत्नागिरीचा सौदागर
( पद केदाराचें त्रिवट )

रत्नागिरीचा सौदागर नाथ भजाया या ।
ध्यात असे जो पाय तरला । काय उणे उमजाया रे ।।१।।
इच्छावें तें पूर्ण करितों । भावें करुनी पूजाया रे ।।२।।
संतसमागमीं सादर होउनी । अभिमान वर्जाया रे ।।३।।
नाथभुजंग सखा सर्वांतरी । अगणित गुण गर्जाया या ।।४।।

## १७) जय ज्योर्तिलिंगा
### (पद ललत राग त्रिवट ताल)

जय ज्योर्तिलिंगा । करुणासागरा हर हर पालय माम् ।

नगजापती शिव त्रिपुरारी । हृदयांबुजी ध्याये मुरारी ।।
मदनांतक सुखदायक सज्जनीं । निष्ठुर दुर्जनीं दंडण करी गा ।।१।।

त्र्यंकाळेश्वर शिवशंभो । तव स्मरणीं मन न विसंभो ।
जाग जाग ये लागतसे पदीं । दास तुझा किंत (?)नाथभुजंग ।।२।।

## १८) नाथा आस तुझी
### ( पद काफी जंगला )

नाथा आस तुझी । तूं माउली माझी ।।
तूं जगज्जीवन ज्योतिस्वरूपा । नामसुधारस पाजी ।।१।।
गर्भीं बाळक पोषण त्याचें । जीववील कोण दुजी ।।२।।
देतील काय धनांध जनाला । विनविजे पाहुनि मर्जी ।।३।।
नाथभुजंग मी तव गुण गातों । होउनी पायरजी ।।४।।

## १९) केदारा कोमलहृदया
### (पद देसवाली जयजयवंती ताल त्रिवट )

केदारा कोमलहृदया । उदारा परम सदया ।।
टाकिली कशी मजवरली दया ।।१।।

श्रीनाथराया करू काय भवाब्धि तराया ।।
तुजविना मी होउनी परदेशी । संचरलों देशविदेशीं ।
मोकलुनी कैसें मज देशीं ।।२।।

दुस्तरतर तुंबळ वारी । जळचरभय कोण निवारी ।।
होसी तूंचि माझा कैवारी ।।३।।

मी पतित म्हणोनि मजला । त्यजिलें त्वां अर्थ समजला ।।
भोगविल्या चौऱ्यांशी मजला ।।४।।

तारक तुम्ही भक्तहृदाचे । अभिमानी पुर्ण ब्रिदाचे ।।
धनी नाथभुजंग वरदाचे ।।५।।

## २०) अति त्वरें तुझे पाय दावीं
## ( पद कल्याण, ताल बिलंदी )

अति त्वरें तुझे पाय दावी । केदारा ये ।।
पतित जनांप्रती पावन केलें । श्रुती मती किती ते वदावी ।।१।।
तुजवीण कोण मला न बंधू । सत्वर उशीर न लावी ।।२।।
व्यापक तूं जगदांतर्यामी । निजतनू कशी ओळखावी ।।३।।
शाम चतुर्भुज सुंदर उभे । चिन्मयरूप तेंचि दावी ।।४।।
नाथभुजंग मी आत्मारामा । अति त्वर उशीर न लावी ।।४।।

## २१) जीवन माझें सये डोंगरीं
## ( पद काफी जंगला )

जीवन माझें सये डोंगरीं । रत्नागिरी ।।
पूर्व पदांबुजें देहुड उभें । पाहतसे दक्षिण दिगंतरीं ।।१।।

सावळं सुंदर चिन्मय रुपडें । व्यापक जो जगदांतरीं ।।२।।
नाथभुजंग तयास विलोकी । पूर्ण दिसत बाह्यांतरी ।।३।।

२२) **चतुर्भुज रूप चांगलें**
**(पद गत लंगडी बिलंदी)**

चतुर्भुज रूप चांगलें । ध्यान लागलें ।
सगुण सुंदराचे पायीं । चित्त रंगलें ।

नट नाटकी या वामना । पाहून मना ।
चटक लागले बाइये । पुरवी कामना ।।१।।

रत्नखचित महा मंदार । त्रिपुटी केदार ।
मोक्षा द्यावया दीनालागी । बाप उदार ।।२।।

रज तम सत्त्व रकार (?) । आयुधाकर ।
धरी त्रिगुणात्मक । विधि विष्णु शंकर ।।३।।

ज्योतिर्मय नित्य सोवळा । गोप गोवळा ।
नाथभुजंग वोळखिला । देव सावळा वो वो ।।४।।

२३) **त्रिभंग देहुडाचरण**
**(पद गत लंगडी)**

त्रिभंग देहुडाचरण । चतुर्भुज ध्यान ।
सगुण साजणी । हृदयीं भरलें संपूर्ण ।।१।।

कोटि बालार्क इंदुवर्ण । जें उजळत सुवर्ण ।
नाना अलंकारीं नटलें । फाकती किर्ण– (किरण) ।।२।।

वाम करीं त्रिशूल पात्र । खड्ग डमरूधर ।
त्रिजगज्जीवन तारक । जोगी दिगंबर ।।३।।

कानीं मुद्रा मंडित मणिमय । रूप ज्योतिर्मय ।
शेषासनीं उभें बाईये । स्वरूप चिन्मय ।।४।।

पतीत पावन दीनबंधू । सुखाचा सुखसिंधू ।
नाथभुजंग त्याचे पायीं । करी नित्यानंदू ।।५।।

**२४) वद गिर केदाराचा**
**( पद कल्याण ताल बिलंदी )**

वद गिर केदाराचा । चांगभला ।
धरिली भू शिरीं ज्या रिपुगिरिनिवासी ।
प्रकटे करवीर साद रत्नागिरीसी
दक्षिणपती दनुजदमन चतुर्भुज शोभला ।।१।।
सव्यपाणि चर्पट जगदंबा आहे कीं ।
रामलिंग जगत्रयजननी पश्चिमे विलोकी ।
करुनि नमन (नादर्दी तिला ण? )
मधुर सरस भेला ।।२।।
त्रिशुल पात्र खड्ग डमरु शेषारूढ जाला ।
तारक चिन्मय निधान भक्तजनाला ।
नाथभुजंग दीर्घध्वनी प्रार्थी सभेला ।।३।।

## २५) पाहूं नाथ चला या
**(पद दरबारी ताल त्रिवट)**

पाहूं नाथ चला या । जो जगीं संचला या ।।
पतित जनांप्रती पावन केलें । सुधा पथ सुचला या ।।१।।
भजती मुनिजन संत जयाला । विविधा पद उचलाया ।।२।।
नाथभुजंग मी रंगुनी रमला । नामीं जीव रुचला या ।।३।।

## २६) भू नव्हे अनळु
**( पद अभंग )**

भू नव्हे अनळु । वायु नव्हे जळु ।।
नभासी पोखळु । भासे आभासे ।।१।।

तें पाहालें पाह्राणियाचें । पाहाणें सांगू काय वो ।।
आगमागोचर हो । नयनीं गोचर हो ।
सकळीं संचरुनी घनानंद ।।२।।

आहे निरंजन हो । भवनाभंजन हो ।
मनासी रंजन । सगुण सरूप ।।३।।

रामकृष्ण गाये । सुगम उपाय हो ।
धरी गुरुपाय । नाथभुजंग ।।४।।

## २७) नाथा तुझें पायीं जीविचें निजधन रे
### ( पद जोगी राग, ताल त्रिवट)

नाथा तुझे पायीं जीविचें निजधन रे ।।
यावीण एरव्ही नेणे मी कांहीं । शास्त्र–पुराण–शोधन रे ।।१।।
जप तप तीर्थ व्रतही घडेना । न करी आणिक साधन रे ।।२।।
हरिहर भूसुर सुरवर करिती । निशिदिनीं हेचि आराधन रे ।।३।।
नाथभुजंग या चपळ मनाला । होईल दृढ बंधन रे ।।४।।

## २८) नाथा तुझे पायीं माझे चित्त रंगलें
### ( पद राग तोडी त्रिवट )

नाथा तुझे पायीं माझे चित्त रंगलें ।
पाहिले सकळ भूतळीचे देव। असें नाहीं कोठें नटरूप चांगलें रे।।१।।
चतुर्भुज घनश्याम पदांबुजीं । चपळ मन भ्रमर गुंगलें रे ।।२।।
काम क्रोध मद मत्सर दंभ । अरि षड्दळ दुरी रिपू तरंगले रे।।३।।
नाथभुजंग तुझे गुण गातां । भवभयाचे अचळगिरी भंगले रे ।।४।।

## २९) पाहूं चाल गडे साजनी
### ( पद झिंजोटी रागणी )

पाहूं चाल गडे साजनी । नाथ सख्याचें रूप ।।
परब्रह्म परम त्या चाळक पाळक । त्रिभुवनभूप ।।१।।
निराकार आकारा येउनि । रमारमण चिद्रूप ।।२।।
मत्स्य कच्छ वराह नरहरी । वामन भृगु अपरूप ।।३।।

राम कृष्ण हा बौद्ध कलंकी । उमारमण तद्रूप ।।४।।
हिमाचळाहुनी रत्नागिरीवरी । आला हो ज्योतिस्वरूप ।।५।।
नाथभुजंग सुसंगतीं रंगुनी । राहूं कीं सुखरूप ।।६।।

## ३०) भोळ्याभाळ्याचा नाथ पाहूं

### ( पद आनंदभैरवी )

भोळ्याभाळ्याचा नाथ पाहूं चला हो या ।।
उत्तरेहुनी दक्षिणे आला । दैत्यवधा मोट (X) डोळ्याचा ।।१।।
असुर मर्दुनी सुर संरक्षी । साधुजनां शुद्ध मोलाचा ।।२।।
ज्योतिरूप त्रिभुवनदाता । भक्तपूजे माशा तोळ्याचा ।।३।।
चैत्र उन्हाळा निघती यात्रा । न निघे त्या पिंड घोळ्याचा ।।४।।
शिळ्या भाकरी कोडवळीखा । लाही पिठा चिंच गोळ्याचा ।।५।।
शुद्ध हरिदिनीं दर्शन घ्यावें । करितो पातक होळ्याचा ।।६।।
द्वादशिला पात्र पूजिती । सावरती जोगी झोळ्याचा ।।७।।
खर्जुर नारळ केळ । शेवई भात तूप पोळ्याचा ।।८।।
हिंग जिरे मिरे खोबरें घ्यावें । धटी पितांबर चोळ्याचा ।।९।।
नाथभुजंग प्रभु सौदागर । इच्छित दे सुखसोहळ्याचा ।।१०।।

## ३१) ध्याई ध्याई शिव ज्योतिर्लिंग

### (पद धनाश्री रागणी)

ध्याई ध्याई शिव ज्योतिर्लिंग ध्याई ।
ज्योतिर्लिंगाचें नाम वाचे गाई ।।

शंकर हृदयीची ज्योत कीर्ती गा जा ।
हिमालय पर्वती अवतरले महाराजा ।
तेहतीस कोटी देवाचे केलें काज ।
दक्षिणदेशीं मारिले दैत्य राजे ।।१।।

दक्षिणदेशीं पर्वत मैलागिरी ।
दैत्य रत्नासुर मर्दुनिया वस्ती करी ।
त्याचे नामें वसविला रत्नागिरी ।
तेथे देव नांदतो ब्रह्मचारी ।।२।।

रामलिंग शक्तीला आपण ठाणें दिलें ।
दुष्ट नष्ट दैत्य भंगा मेळविलें ।
साधुसंत जन सेवेसी लाविले ।
योगियाच्या हृदयीं ज्योतीचे उजाले ।।३।।

चैत्र पूर्णामासीं आनंद होतो तुझा ।
निर्वाणीची वस्ती डोंगरीचा राजा ।
संकट भक्ताचें निवारुनी पावे काजा ।
नाथभुजंगाचे हृदयी ध्यास तुझा ।।४।।

**३२) ऐसें कैं नाथ करी मजला**
**(पद सोरठ त्रिवट)**

ऐसें कैं नाथ करी मजला ।।
निर्द्वंद्व निराहंकृत होउनी । स्वसुखा जिववूं मजला ।।१।।
निगमागमीचा अर्थ अनुभवें । सकळ मना समजला ।।२।।

नाथभुजंग मी चौऱ्यांशीच्या । न घडती पुढें मजला ॥३॥
ऐसें कैं नाथ करी मजला ॥

**३३) केदारा मी आतां**
**(पद सारंग, ताल त्रिवट)**

केदारा मी आतां धरिली तुझीं मी कास रे ॥
तुजवीण साधन आणिक नेणे । न करी आणिकाची आस रे ॥१॥
नेणुनी तुजला दर्शन साही । भ्रमत फिरती उदास रे ॥२॥
नाथभुजंग तुझ्या पदकमळीं । मानुनी दृढ विश्वास रे ॥३॥

**३४) नाथाजीचे पाय पाहूं चला**
**(पद जंगला मध्य ताल)**

नाथाजीचे पाय पाहूं चला । नाथाजीचे पाय ।
चौऱ्यांशीचें भ्रमण जिला । हा अलभ्य लाभ मनीं सुचला ॥१॥
हा नरदेह फिरुनी मिळेना । पहा जगामधी कुणी वांचला ॥२॥
नाथभुजंगाचा कैवारी । जिवलग सखा करूं जीवीं संचला ॥३॥

**३५) केदारा निजरूप दावी मला**
**(पद जंगला त्रिवट ताल)**

केदारा निजरूप दावी मला । दावी मला लौकरी ॥
मी करूं काय हा जीव श्रमला ॥
ध्यात असे दीन गाय मजसी तूं । विसरलासी निश्चयें गमला ॥१॥

चतुर्भुज घनश्याम सुंदरा । मुखारविंद कोमला ।।२।।
नाथभुजंग अनाथबंधू तुझे । इच्छी चरण पदयुग कमला ।।३।।

**३६) आम्ही नाथरायाचे दास झालों**
**(पद पूर्वि ताल बिलंदी)**

आम्ही नाथरायाचे दास झालों ।
येणें जाणें नित्य जिवाला । भय धरी कोण मरायाचें ।।१।।
अवतारादिक येती जाती । पहा जगीं काय उरायाचे ।।२।।
नाथभुजंग मी या निज(x)गी । अघटित भवाब्धी तरायाचें ।।३।।

**३७) पाहिला दिठीं कांत योगेश्वरीचा**
**(पद ठुंबरी जंगला)**

पाहिला दिठीं कांत योगेश्वरीचा । भवारि भैरव ।
भजनीं गौरव । निर्भय इहपरलोकांत ।।१।।

जोगाईचा पाहिला दिठीं कांत । त्रिशूल पात्र खड्ग डमरूधर ।
सगुणा (x) निर्गुण व्यापकांत ।।२।।

डोळियाचा डोळा तमाळसुनीळा । निरसुनी बाहे आकांत ।।३।।

श्रीमुख सुंदर रूप मनोहर । अतसिकुसुमसमकांत ।।४।।

नाथभुजंग आसन निजध्यानीं । हृदयीं विराजित एकांत ।।५।।

३८) पाहूं आनंदरूपास्वरूपा
(पद जंगला ताल बिलंदी)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५२२
दा. क्र. ३२६५०

पाहूं आनंदरूपास्वरूपा ।।
निर्गुण अगुणाचे गुण । सुंदर सगुणाचे ।
नेति नेति वदती । निगम भूपा अरूपा ।।१।।

पाहू आनंदरूपा स्वरूपा ।। नाथभुजंग सच्चिदानंदपद विलोकू ।।
चतुर्भुज घनश्याम जोतिस्वरूपा ।।२।।

पाहूं आनंदरूपा स्वरूपा ।।

३९) वंदे उत्तरेश्वरा शिवहर कर्पूरगौरा
(पद आनंदभैरवी)

वंदे उत्तरेश्वरा शिवहर कर्पूरगौरा पार्वतीरमणा ।

गणपती कामेश्वर रामेश्वर दक्षिणेश्वर अघशमना ।
मध्येश्वर गौरेश्वर शंकर घुटकेश्वरा वृषभगमना ।।१।।

वेदचतुष्टचहयरथगमना नगराजधनु (x) त शेषाहारी ।
शरकृत त्रिपुरासुरदमना ।।२।।

मारुती वाघोबा नागोबा महीपती मन सुमना ।
पुजोनी स(x)श्वर शाकांभरी नाथभुजंग विनये नमना ।।३।।

## ४०) जय जय शिव भोला शंभो

**।। श्री शिवसांब प्रसन्न ।।   (पद सोहनी रंगधुमाळी)**

जय जय शिव भोला शंभो । वंदे वृद्धेश्वर हर हर भो ।।

वरदे तीनग्रामसत्परर ।
स रि गा गा रि ग मा गा रि स स स्सा रि ग म ग रि स गा गा ।
गा गा ई या ई या ऐ ये त्यै ये ति यं वै या ।
रे रे ति अै यै या अ अ अ आ अ आ ।
सिद्धेश्वर शरण शरण विभो ।।१।।

विश्वेशा विश्वनाथ शूली ।
महेश भवक्लेशनिवारण जगद्गुरू जगदीशा ।।
महादेव ज्योतिस्वरूपा । गिरिजापती नाथभुजंग पदीं ।।
करुणालय पालय शंभो ।।२।।
जयजय शिवशंभो ।।

## ४१) ध्यावा शिव सांब

**(पद कल्याण त्रिवट)**

ध्यावा शिव सांब । शूली जगदंब ।।
विश्वनाथ विश्वेश विश्वपती । बसवेश्वर श्रीभैरव चंडी अंब ।।१।।
धूपदीप कर्पूर निरांजन । तंदूल बिल्वपत्र वहावें अविलंब ।।२।।
खर्जूर नारळ केळ फळावरी । खाद्य नैवेद्या शर्कर भरोनी जांब ।।३।।
भोळें भक्ती पूजावा शंकर । देतो निज सुख संपत्ती न करी विलंब
सिद्धेश्वर कर्पूरगौरहर । नाथभुजंग पदांबुजीं तरवी भवांब ।।५।।

४२) **पंचानन दशकरा**

**(पद पंचम धुमाळी)**

पंचानन दशकरा । सिद्धेश्वर भोळ्या शंकरा ।।१।।
निजरूप दावी मला दावी मला । तुझे पदीं जीव रमला ।।
निजरूप० ।।
आगमागोचर मुद्रा । गोचर प्रकट विश्वरूप समुद्रा ।।२।।
निर्गुण निर्विकारा । सगुण होउनी आणिलेंसी आकारा ।।
दर्शनीं त्रिताप शमला । नसें भवभय हा निश्चय गमला ।।४।।
नाथभुजंग केदारा । आंतरबाहीर तूंचि उदारा ।।५।।

४३) **नमो सिधोबासाहेबाला**

**( पद आदीवैराळी मध्यताल, त्रिवट ताल फेर )**

नमो सिधोबासाहेबाला । वंदनशरण सिधोबासाहेबाला ।।
शिवपते हर सांब । जनीं विजनीं तू शूली जगदंब ।।
अंबिकानाथ शंभो । तव चरणीं हें निजमन क्षणभरी न विसंबो ।।
भजनीं पूजनीं श्रवणीं मननीं गुणीं ।
नाथभुजंग रंगला अनुदिनीं ।।१।।

वदगिर तों तना अनंत नाना । ता ना द र ता ना द र ना द र ।।
गिरिजावर गंगाधर ईश्वर । स स्सा री गा री रि स ।।
रि सा नी रि सा नी सा नी । धा नी ध प नि ध प म ।।
म प धा नी प ध नी । धा नी ध प नि ध प म ।।
सा री गा री सा री सा नी । साहेबाला ।।२।।

**४४) पांडेश्वर ईश्वर पांडेपुरींत**
**( श्रीपद आनंदभैरवी )**

पांडेश्वर ईश्वर पांडेपुरींत विजे (विराजे? )
करुणाकर कर्पुरगौर । गिरिजावर गरीबनवाज ।।१।।
पूर्ण परात्पर परमेश्वर हर । शिवशंकर महाराज ।।२।।
नाथभुजंग अभंग लिंग । जगदांतरी कीर्ती अगा जे ।।३।।

**४५) शंभू हर हर रे**
**( पद हामीर कल्याण )**

शंभू हर हर रे । गिरिजावर गंगाधर ईश्वर ।
भूतनाथ भूतेश पशुपते । विश्वेशा विश्वनाथ षड्गुण ऐश्वर्य रे ।।१।।
पंचमुख दशकर त्रिशूलधरा ।
पिनाकधर डमरुधर तूं जगदीश्वर रे ।।२।।
दृश्यभास चिद्विलास जाणुनी ।
नाथभुजंग पदांबुजीं त्यागुनी नैश्वर्य रे ।।३।।

**४६) भज मन हर हर**
**( पद कानडा बिलंदी)**

भज मन हर हर हर हर सांबशूले ।
नसे भय सुख आलय सदय शिवशंकर शूले ।

दशकर पंचम कंधर मंदाकिनी मौले ।
विश्वेश्वर भवभयहर विश्वंभर शूले ।।१।।

मुंडमाल फणि त्रिपुंड्र लोचन शशि भाळे ।
डमरुकर पिनाकधर व्याघ्रांबर शूले ।।२।।

गिरिजापति वृषभारूढ भसितविभूषण धूले ।
रक्ष रक्ष नाथभुजंग जगदीश्वर शूले ।।३।।

**४७) शिव ध्यानीं पाहिला वो**
**(पद कल्याण यमन ताल त्रिवट)**

शिव ध्यानीं पाहिला वो ।।

सद्गुरुवरद । साधिलें वो निजपद ।
केली हृदईं सनद । तनू कागद सुबुद्धी मन लिहिला वो ।।१।।

माधव जननी अमळ । भावभजन विमळ ।
पद ठेवुनी कमळ । नाथभुजंगी तंदुळ बिल्व वाहिला हो ।।२।।

**४८) भजावा त्रिपुरारी**
**( पद यमन ताल त्रिवट )**

भजावा त्रिपुरारी । मुरारी मित्र
देईल सायुज्यपद सुखकारी ।।

वदनें उच्चारितां । उचिता न चुके शूली ।।
रजनीचराचा पती । आराधिला शिव दिल्ही नारी ।।१।।

पंचमुख पाणि दहा । दानव दमिलें बळें ।।
वामांगी गिरिजा ज्याचे । उरगभूषण मौळीं वारी ।।२।।

माधव जननी भावें । आराधिला उमाधव ।
भुजंगनाथासी शिव । देउनी अभय भवीं री ।।३।।

४९) **आलासी जोतिबा जोतिबा**

**( पद श्रीनाथाचे )**

आलासी जोतिबा जोतिबा । तूं चिन्मय मूर्ती बा ।।

अलक्ष निर्गुण निर्विकारा । भक्तिलोभें सगुण आकारा ।।
धरिलें स्वरूपसाक्षात्कारा । सोलिव सुनीळाचा गाभा ।।१।।

आधीं हिमाचलीं रहिवास । त्यजुनी श्रीरेणुकानिवास ।।
रत्नागिरीवरी सुखसहवास । तूं रामाचा खळोबा ।।२।।

पोखाया गज तट्टू टार । टाकुनी वाई देश पाठार ।।
फलटन चौऱ्यांशी वाठार । येथ समपद कां उभा ।।३।।

नवविध भक्ती नवविध वाडे । येकापरीस येक निवाडे ।।
उंची आटा बिकट कवाडें । सुंदर मंदिर दिव्य प्रभा ।।४।।

रिद्धी सिद्धी सानुकूळ । बागबगीचे आम्र बकूळ ।।
प्रत्यक्ष नंदाचें गोकुळ । पाहुनी भुललासी कीं बा ।।५।।

आपा भाविकभोळे सांब । भवानीबाई विमल जगदंब ।।
कराया भक्तिरस आंब । निजजन तारायासी कीं बा ।।६।।

भवानी केवळ माय सुपर्णा । शाल्योदन घृत वरणा ।।
नैवेद्या दे अन्नपूर्णा । नित्या कीं वाटे अचंबा ।।७।।

आतां विनंती हे परिसावी । अचळ संपत संतती असावी ।।
सेवा पुत्रापौत्रीं सस (?) वी । द्या गज तुरंग सिबी सुबा ।।८।।

आरोग्य काया असो अभंग । नित्य घडावा साधुसंग ।।
म्हणोनी प्रार्थी नाथभुजंग । रेणुकेच्या वल्लभा ।।९।।

**५०) नाथासी शरण जावें**

**( आर्या )**

नाथासी शरण जावें हित उमजावें धरोनी हेत मनीं ।
सुमनीं नित्य पुजावें नाथभुजंग सुशिवार्चंती नमनीं ।।

**५१) श्रीनाथराया । तुजवीण मजशीं कोण ।।**

**( पद बिलंदी ताल )**

श्रीनाथराया । तुजवीण मजशीं कोण ।।

होतों तुजमाजी मजशीं त्यजिलें त्वां देवा ।।
जनन मरण चौऱ्यांशी लाविलें फिराया ।।१।।

दिधली बहु त्रास करूनी मानव तनु सखया ।
नाथभुजंग प्रार्थितसे भवाब्धी उतराया ।।२।।

५२) पाहूं राजाधिराज

(सोरठ मध्यताल)

पाहूं राजाधिराज । नाथ महाराज ॥
रत्नागिरीवर श्रीसौदागर । साहेब गरिबनवाज महाराज पाहूं ॥१॥
ज्योतिस्वरूप त्रिभुवनभूप । नाथभुजंग निगु (x) महाराज पाहूं

५३) नाथ सौदागर सौदागर

(पद कल्याण ताल त्रिवट)

नाथ सौदागर सौदागर । साहेब सौदागर सौदागर ॥
बद्रीनाथ बद्रिकाश्रमीचा । आत्मसुखाचें आगर ॥१॥
रिद्धी सिद्धी भांडारी निधिपती । घर रत्नागिरी डोंगर ॥२॥
रामलिंग चोपडाई माता । ज्योतिस्वरूप नटनागर ॥३॥
बैसविला ध्रुवबाळ अढळपदीं । उपमन्यू क्षीरसागर ॥४॥
नाथभुजंग सुसंगती रंगुनी । करूं हरजागर ॥५॥

५४) गाऊं नाम बरें नाथाचें

( पद जंगला त्रिवट )

गाऊं नाम बरें नाथाचें । नाथाचें गाऊं नाम बरें ॥
इच्छावें घरबसल्या देतो । पूर्ण होती सकाम बरें ॥१॥
पतित ते जन पावन केले । पावविले सुख धाम बरें ॥२॥
नाथभुजंग सुवंशपरंपरा । करुनी घेऊं इनाम बरें ॥३॥

## ५५) आम्ही नाथ सखा गडी केला
### ( पद जंगला ताल त्रिवट )

आम्ही नाथ सखा गडी केला ।।
भजनपूजन कांहीं कळेना । निर्मळ भाव भुकेला ।।१।।
पतितपावन नाम जयाचें । उद्धव गज गणिकेला ।।२।।
नाथभुजंग भवाब्धी तराया । जनन मरण सुटकेला ।।३।।

## ५६) भजूं या भैरवा
### (भैरव राग चौताल, मध्यताल त्रिवट)

भजूं या भैरवा । घोर भवाब्धी तराया ॥
करूं नाम घोष । धरोनी भावा ।।

भजनीं पूजनीं जनीं । ध्यानीं मनीं चतुर्भुज ॥
त्रिशूल डमरू पात्र । आयुधासहित रूप मिरवा ।।१।।

योगेश्वरीचा रमण । दमन दनुजदळा ।।
सकळकळाचा स्वामी दाता । मधुर मधुर स्वर आळवा ।।२।।

नाथभुजंगाचा स्वामी । पूजूया अंतर्यामीं ।।
नांदू सुखधामी । पदीं स्थिर व्हा व्हा ।।३।।

## ५७) भज मन भावें श्रीभैरवाला
( पद आसावरी ताल त्रिवट )

भज मन भावें श्रीभैरवाला । भज मन ।।
साधकासी निज स्वात्मसुखाचा । देतो नगद निवाला ।।१।।
जोगाई आदि जुगादि माय । योगेश्वरीधवाला ।।२।।
क्षेत्रपाळ दीनदयाळ दाता । पाळी सकळ जिवाला ।।३।।
नाथभुजंग पदपंकजीं रंगुनी । तरला न भी भवाला ।।४।।

## ५८) भैरव जोगाई जोगाई
( पद भैरव जोगाई )

भैरव जोगाई जोगाई । ज्या कृपा करी तो गाई ।।
देउनी नाम तगाई । करी बरीं रामकृष्ण संगाई ।।१।।
देवी देव दुर्गाई । जरीमरी मायराणी फिरंगाई ।।२।।
नाथभुजंग नित गाय । पान्हावे वत्सा जशी गाय ।।३।।

## ५९) निजानंद सहजानंदबाई
( पद जंगला )

निजानंद सहजानंदबाई ।।धृ०।।
एक तिचे निजगुज कानी । सांगुनी मज लावियला छंदबाई ।।१।।
ज्योतिस्वरूप प्रताप जयाचा । कोटी रवि शशी प्रकाश मंद बाई
नाथभुजंग मी शरण तयाला । भेटवा श्रीगुरु जगद्वंद्य बाई ।।३।।

६०) हर हर परमेश्वरा
(आरती परमेश्वर)

हर हर परमेश्वरा । कर्पूरगौरा गिरिजावरा हो ।।
पंचारती ओवाळूं । रामलिंग विश्वेश्वरा हो ।।धृ०।।

अगमागोचर मुद्रा । शिरीं मंदाकिनी भालचंद्रा हो ।।
विषप्राशन नीळकंठ । फणींद्र मुंडमाल महारुद्रा हो ।।१।।

पंचानन दशकरा । भोळ्या नाथा करुणाकरा हो ।।
त्रिशूल पात्र डमरू । पिनाकपाणि शिवशंकरा हो ।।२।।

चर्चन भस्मोद्धारा । नग जामाता निजनिर्धारा हो ।।
व्याघ्रांबर गजचर्म । तुजला अतिप्रिय जगदोद्धारा हो ।।३।।

बद्रीनाथ केदारा । वस्ती हिमाचलिं ( X ) दारा हो ।।
भुजंगनाथ भावें । आला शरण सख्या उदारा हो ।।४।।

ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
शाखा

## ६१) जय देव जय देव जय क्षेत्रपाळा

## (आरती क्षेत्रपाळाची)

जय देव जय देव जय क्षेत्रपाळा ।
पंचारती ओवाळू त्रिभुवन भूपाळा ।।

दुर्जय भवदनुजारी भजतां सुखकारी ।
लीला वर्णिती चारी अनुपम अवतारी ।।
वारी संकट भजन जड मूढ जन तारी ।
अनुदिनीं महिमा वर्णिती अष्टादश चारी ।।१।।

पंचभूतात्मक क्षेत्रीं संरक्षण अससी ।
हृदईसर (?) जो विवेक वाजीवर बससी ।।
अनाथनाथ अनादि सिंगी वाजविसी ।
सर्व ब्रह्मनादें त्रिभुवन गाजविसी ।।२।।

त्रिशूल डमरू विराजित स्वामी सर्वज्ञा ।
सुरवर दानव पन्नग पाळीत तव आज्ञा ।।
मुनिवरतोषक होसी संरक्षण यज्ञा ।
निजरंगा सुखरंगा सर्वंही सर्वज्ञा ।।३।।

REFBK-0024650
REFBK-0024650

# ‘पैलतीर’ दिवाळी वार्षिक १९८४

## या संग्राह्य अंकाचे अंत:स्वरूप

१. **जागृती, स्वप्न, सुषुप्ती व ब्रह्मानुभूती – महामहोपाध्याय श्री. यज्ञेश्वर–शास्त्री कस्तुरे** (त्रिविध अवस्था व त्यापलीकडील परब्रह्म यांचे ऋषिमुनीप्रणित मौलिक चिंतन.)

२. **पुण्यसंकल्पनेचा वेध – वे. शा. सं. पंडित श्री. श्रीपादशास्त्री जेरे** (प्रपंच व परमार्थ या उभय क्षेत्रांत सफलता लाभण्यासाठी पुण्याची अपरिहार्यता प्रतिपादन करणारा लेख.)

३. **श्रीगुरुकृपेचे अंतर्विश्व आणि त्याचा अंतरंग अधिकारी – प्रा. कृष्णा गुरव** (अंतर्यामीच्या परब्रह्माप्रत पोहचेपर्यंत साधकास अनेक संकटांना तोंड देत, गूढनिगूढ मार्गांवरून जावे लागते. यासंबंधी अत्यंत परखड व सांगोपांग मौलिक चिंतन.)

४. **हिरकणी – सौ. कमल लडकत** (प्रपंचातील अग्निदिव्यातून ज्वलंत तळ–मळीने परमार्थाचे पैलतीर अनुभवलेल्या एका वास्तव जीवनाचे दर्शन.)

५. **पश्यंती विद्या वलय : एक दर्शन – एक साधक** (कोल्हापूरातील ‘पश्यंती विद्या वलय’ या आध्यात्मिक संस्थेत साधकांच्या दृष्टीने गेली आठ वर्षे चाललेले कार्य – ज्ञान–ध्यान, आत्मचर्चा, साधनाशिबिरे, पारायणसप्ताह, ग्रंथनिर्मिती व नैमित्तिक पारमार्थिक–सांस्कृतिक समारंभादी कार्याचे दर्शन)

६. **योगी श्रीतारकनाथशिष्यविरचित स्वात्मानुबोध, स्वात्मानुभूती, पूर्णबोध व योगखूण** ही सुमारे दीडशे वर्षांपूर्वीची छोटी मोठी ओवीबद्ध प्रकरणे प्रथमत:च प्रकाशित.

७. **सुमारे तीनशे वर्षांपूर्वीच्या ज्ञानेश्वरीच्या एका मौलिक हस्तलिखिताचा परिचय – प्रा. कृष्णा गुरव**

याशिवाय **डॉ. रा. चिं. ढेरे, श्री.मु. गो. गुळवणी, डॉ. गं. वि. कुलकर्णी** इ. मान्यवरांचे मौलिक लेख.

**पृष्ठे १८०, किंमत रु. १५ फक्त** (संपादकांच्या पत्त्यावर अंकाची किंमत व पोस्टेज मिळून वीस रुपये पाठविल्यास अंक रजि. पोस्टाने पाठवू.)

**संपादक : प्रा. कृष्णा गुरव,** ‘पश्यंती’ ९४, साळोखे नगर, कोल्हापूर.

## ‘ पश्यंती प्रकाशना ’ ची

**प्रा. कृष्णा गुरव यांची नामवंतांनी गौरविलेली संग्राह्य प्रकाशित पुस्तके**

### ■ कैवल्यलेणे

( श्रीज्ञानेश संदर्भातील संशोधन-चिंतनपर लेखांचा संग्रह. )
विवेचक प्रस्तावना : **डॉ. रा. चिं. ढेरे** □ आवृत्ती संपली आहे.

### ■ कुंजधून

(दैवताजा नितळ निसर्ग, राधाकृष्णाची विविध भाव-परिमाणे घेऊन अवतरलेले अत्यंत तरल विश्व, भारतीय संस्कृतीची चिरमंगलता, कालातीत परम सौंदर्याचे गूढनिगूढ भावविश्व या सर्वांची कलात्मक अनुभूती घडविणारा काव्यसंग्रह.)
रसोत्कट प्रस्तावना : **डॉ. रा. चिं. ढेरे** □ पृष्ठे १०० किंमत रु. १५

### ■ अजानवृक्ष : एक कैवल्यलेणे

नाथपंथ व वारकरी संप्रदायाशी अनुबंधित असलेल्या अजानवृक्षाचे, संतवचनाधारे ज्ञानसाधना व धार्मिकदृष्टचा माहात्म्य.
‘ अजान ’ या नावाची संतांच्या दार्शनिक दृष्टिकोनातून नवी व्युत्पत्ती.
□ किंमत रु. ५

## संपादित प्रकाशने :

### ■ श्रीज्योतिबाची पदे (संत श्रीनाथभुजंग-विरचित)

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या श्रीज्योतिबावरील पेशवेकालीन संत श्रीनाथभुजंग यांची विविध रागदारीतील प्रथमतःच प्रकाशित झालेली पदे. सोबत प्रा. कृष्णा गुरव यांनी करून दिलेला श्रीनाथभुजंग यांचा विस्तृत जीवन परिचय.
□ किंमत रु. १०

### ■ ‘ पैलतीर ’ दिवाळी वार्षिक १९८४

पृष्ठे १८० □ किंमत रु. १५